# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवायं समर्पिता

## दिनांक १८-०२-२०१७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शनिवार दिनांक दिनांक १८ फेब्रुवारी २०१७ रोजी (का.प.क्र.३५) मा.महापौर श्री.भगवान (बापू) देविदास घडमोडे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११-१५ वा वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. या सभेला मा.आयुक्त श्री.ओम प्रकाश बकोरिया,आयएएस, नगरसचिव, श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे
२. स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
३. स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास
४. स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
५. स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू
६. स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण
७. स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
८. स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
९. स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव
१०. स.स. श्री.विजय साईनाथ औताडे
११. स.स. श्री.सुरे सीताराम इसराम
१२. स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे
१३. स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान
१४. स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे
१५. स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी
१६. स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद
१७. स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ
१८. स.स. श्री.सय्यद मतीन रशीद
१९. स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल
२०. स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी
२१. स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
२२. स.स. श्री.खान जहांगीर मुलानी
२३. स.स. श्रीमती खरात सिमा गणपत
२४. स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे
२५. स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
२६. स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र
२७. स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी
२८. स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले
२९. स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग

३०. स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
३१. स.स. श्री.शिंदे राजु रामराव
३२. स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम
३३. स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
३४. स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ
३५. स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी
३६. स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया
३७. स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज
३८. स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव
३९. स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
४०. स.स. श्री.एडके विकास प्रकाश
४१. स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव
४२. स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी
४३. स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास
४४. स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास
४५. स.स. श्री.शेख जफर अखतर
४६. स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब
४७. स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश
४८. स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत
४९. स.स. श्री.बारवाल गजानन रामकिसन
५०. स.स. श्रीमती बनकर विजया संजय
५१. स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
५२. स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र
५३. स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
५४. स.स. श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे
५५. स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव
५६. स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र
५७. स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
५८. स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव
५९. स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल
६०. स.स. श्री.सोहेल शकील शेख
६१. स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
६२. स.स. श्रीमती साळवे अनिता मोहन
६३. स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब
६४. स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
६५. स.स. श्रीमती मिना रामदास गायके
६६. स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
६७. स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम
६८. स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे

६९. स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
७०. स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर
७१. स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ
७२. स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर
७३. स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
७४. स.स. श्री.विकास रतनलाल जैन
७५. स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
७६. स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे
७७. स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
७८. स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी
७९. स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
८०. स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
८१. स.स. कु.जमादार सायली भागवत

**<u>नामनिर्देशित पालिका  सदस्यांची नावे</u>**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
४. श्री.कांबळे चेतन जनार्धन
५. श्री.चंदु किशनचंद तनवाणी

**<u>चर्चा :</u>**

श्री.नंदकुमार घोडेले :मा.पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी यांनी स्वच्छ भारत अभियान योजना सुरू केली. केंद्र शासनाचे पथक शहरात पाहणीसाठी आले होते. त्या पथकाने या शहराचा नंबर वरती आणण्यासाठी लाचेची मागणी केली. त्यांचा जो भ्रष्टाचार करण्याचा हेतू होता. तो मा.आयुक्त यांनी हाणून पाडला. त्याद्दल मा.आयुक्त व त्यांच्या टिमचे  अभिनंदन करावे.

श्रीमती समीना शेख :अभिनंदन करावे.

मा.महापौर :अभिनंदन करण्यात येते.

श्री.राजू शिंदे :यास अनुमोदन आहे. उद्या छत्रपती शिवाजी महाराज जयंती आहे. मागिल वर्षी सुध्दा जयंतीच्या वेळी क्रांतीचौक येथील पुतळ्याच्या परीसरात लाईट व इतर व्यवस्था वेळीच केली नाही म्हणून तत्कालीन आयुक्त यांना माफी मागावी लागली होती. या वर्षी सुध्दा तीच परीस्थिती निर्माण झाली. तेथे अद्याप कोणतीही व्यवस्था केली नाही. अधिकारी यांनी जाणून-बूजून दिरंगाई केली काय? खुलासा करावा. कोणत्याही महापुरूषांच्या जयंतीच्या दिवशीच्या अगोदर त्या ठिकाणी साफसफाई विद्युत रोषणाई केली पाहिजे.

श्री.प्रमोद राठोड :प्रत्येक वर्षी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या वेळेसच असा प्रकार का होतो? तेथे आवश्यक व्यवस्था का केली जात नाही? मा.आयुक्तांनी काही तरी सिस्टीम लावावी. कुणावर तरी जबाबदारी द्यावी. जे काम करणार नाही त्यांच्यावर कार्यवाही करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :तेथील परिस्थिती बघीतली तर हे जाणून-बूजून होत आहे. असे चित्र दिसते. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन येथे आलेलो आहे. महाराजांच्या जयंतीचा विसर पडणार असेल तर हे योग्य नाही. मा.आयुक्तांनी भेट दिली, सर्व व्यवस्था होणार, लाईट लावणार, असे म्हटले होते. परंतु आज सुध्दा तेथे फाटलेले पडदे आहेत. लाईट लावलेले नाहीत. महानगरपालिका खर्च करीत नसेल तर तसे प्रशासनाने सांगावे. आम्ही सर्व शिवसेनेचे नगरसेवक एक महिन्याचे मानधन देऊन सर्व खर्च करण्यास तयार आहोत. प्रत्येक वर्षी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या वेळेसच तेथे साफसफाई, विद्युत रोषणाई करणे, पडदे लावणे हे काम होत नसेल तर हे योग्य नाही. याकडे प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे. त्या ठिकाणचे लाईट व पडदे त्वरीत बदलण्यास आदेशीत करावे.

श्री.भाऊसाहेब जगताप :अर्धवट लाईट लावलेली आहे. पडदे फाटलेले आहेत, असा प्रकार शिवजयंतीच्या वेळेसच का होतो? क्रांतीचौक येथील पुतळ्याच्या ठिकाणी आजही काम केलेले नाही. तात्काळ तेथील काम करावे.

श्री.कैलास गायकवाड :छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आहे. मा.आयुक्त यांनी क्रांतीचौक येथे एकाच ठिकाणी व्हिजीट केली. शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुंडलिकनगर, मुकूंदवाडी, एन-७ भागातही पुतळे आहेत. अशा सर्वच ठिकाणी शिवजयंतीच्या वेळेस तेथील कामे करायला पाहिजे. लाईट विभागाचे उपअभियंता श्री.देशमुख फोन उचलत नाही. विविध कारणे सांगतात. काम करीत नाहीत. त्यांचा चार्ज काढावा.

श्रीमती मिना गायके :पुंडलिकनगर भागात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या ठिकाणी विद्युत रोषणाईसाठी उपअभियंता श्री.देशमुख यांना वारंवार फोन केला ते आले नाही. तेथे साफसफाई होत नाही.

श्री.रामेश्वर भादवे :गेल्या वर्षी असाच प्रकार झाला होता. क्रांतीचौक येथे विद्युत रोषणाई पुतळ्याच्या ठिकाणी केली नव्हती. त्यावेळी मा.केंद्रेकर साहेंबाना माफी मागावी लागली. संबंधीत अधिकारी यांचा त्यांनी चार्ज काढला होता. या वर्षी सुध्दा पुन्हा तेथे साफसफाई, विद्युत रोषणाई केली नाही. संबंधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी.

या वेळी डायस समोर अनेक स.सदस्य एकाच वेळी एकत्र येतात.

श्री.गजानन बारवाल :सभागृहाची भावना लक्षात घेता, त्वरीत तेथे कार्यवाही करावी.

मा.महापौर :मागिल वेळेस मा.आयुक्त श्री.केंद्रेकर यांना माफी मागावी लागली होती. प्रशासनाने दखल घेतली आहे. यापुर्वीच प्रशासनाला सुचना दिल्या आहे.

श्री.अफसर खान :श्री.देशमुख यांचा चार्ज काढण्यात यावा.

मा.महापौर :दहा मिनिटांसाठी सभा तहकूब करण्यात येते.

(सभा ११-२५ तहकूब पुन्हा ११.३५ वाजेला सभा सुरू)

श्री.नंदकुमार घोडेले :सदस्यांनी भावना व्यक्त केल्या. प्रशासनाने खुलासा करावा.

मा.महापौर :मी प्रत्यक्ष तेथे भेट दिली. पडदे फाटलेले होते. बरोबर लावलेले नव्हते. मागिल वर्षी सुध्दा शिवजयंतीच्या वेळेस पडदे वगैरे व विद्युत रोषणाई वेळेवर केली नाही. कर्मचारी अधिकारी यांचे दिरंगाईमूळे श्री.केंद्रेकर साहेबांना माफी मागावी

लागली होती. त्यावेळी त्यांनी असे म्हटले होते की, अशी वेळ पुन्हा येऊ नये. आज रोजी जी काही कामे तेथे केली ती चांगली नाही. यात प्रशासनाने दखल घ्यायला पाहिजे. यात मुद्दामहून कुणी दिरंगाई करीत आहे काय? खुलासा करावा.

मा.आयुक्त :तेथे विद्युत रोषणाई तसेच पडदे लावण्याचा विषय होता. संबंधीत विभागास आदेशीत केले आहे. पुन्हा रात्री ११-३० वाजता मी व्हिजीट केली. पुन्हा आदेशीत केले. आज ३-०० वाजेपर्यंत सर्व विद्युत रोषणाई पडदे व साफसफाई तेथील सर्व कामे केली जातील. मुद्दामहून कोणी दिरगांई करीत असेल तर माहिती घेऊन संबंधीतावर कार्यवाही केली जाईल.

श्री.राजगौरव वानखेडे :हा प्रकार अधिकारी हे जाणून-बूजून करतात काय? दोषी आढळल्यास त्यांचा कार्यभार तात्काळ काढावा.

श्री.कैलास गायकवाड :शहरात ज्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळे आहेत तेथे सर्वच ठिकाणी साफसफाई व विद्युत रोषणाई करावी.

श्री.राजू शिंदे :प्रत्येक महापुरूषांच्या जयंतीच्या वेळी त्या पुतळ्याच्या ठिकाणी सर्व व्यवस्था करायला पाहिजे.

मा.महापौर :प्रशासनाने जे दोषी असेल त्यांच्यावर सात दिवसांत कारवाई करावी.

श्री.राजू शिंदे :गेल्या आठ तारखेला पाणी टँकर बाबत छापून आले की, मंजूरी साताऱ्याची, कामे मात्र शहरात होतात. या प्रकरणाचा खुलासा घेतल्यास हे भ्रष्टाचाराचे मोठे उदाहरण आहे हे लक्षात येईल. र.रु.५ कोटीचे टेंडर कॉल केले नंतर ६७(३) क नुसार एका ठेकेदारास काम दिले. समांतर एजन्सी व महापालिका औरंगाबाद यांचे मा.न्यायालयात प्रकरण आहे व जैसे थे चे आदेश मा.न्यायालयाचे आहे. जे की समांतरकडे टँकर द्वारे पाणी पुरवठा करण्याचे काम राहिल व जायकवाडी फारोळा येथून येणारे पाणी महापालिका करील. विधी सल्लागार यांचा सल्ला घ्यावा समांतर बद्दल जैसे थे आदेश काय आहे? जर मा.न्यायालयाचे जैसे थे आदेश आहेत तर प्रशासनाने मा.न्यायालयाची टँकरची निविदा काढून पाणी पुरवठा करण्यासाठी परवानगी घेतली का? वर्तमानपत्रात निविदा दिनांक १५.११.१६ रोजी कॉल केली. एकच टेंडर आले. पुन्हा रि-कॉल १७.०१.१७ रोजी केले संबंधीत ठेकेदार यांनी मॅनेज करून ३ टेंडर टाकले. त्यानंतर ४ थ्या क्रमांकाचे एका व्यक्तीचे टेंडर आले. त्यावेळी असे लक्षात आले की, चार टेंडर आले त्यानंतर एक शुध्दीपत्र काढून जे निविदाधारक आहे यांची पार्श्वभुमी गुन्हेगारी स्वरूपाची आहे व ज्यांना ४८ तासापेक्षा जास्त काळ पोलीस कोठडीत गेला. अशांना टेंडर भरता येणार नाही. हे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना कसे कळाले? याचा अर्थ जे समांतर एजन्सीला ठेकेदार पाणीपुरवठा करीत होते समांतरच्या प्रकरणात ते दोन दिवस पोलीस कोठडीत होते. जे की, समांतरचे पैसे देता आले नाही म्हणून गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर संबंधीत अधिकारी यांचे लक्षात आले की, संबंधीतांवर गुन्हा सिध्द झाला नाही. पुन्हा प्रशासनाच्या असे लक्षात आले की, गुन्हा सिध्द झाला नाही. अशा व्यक्तीला टेंडर पासून वंचीत ठेवता येणार नाही. पुन्हा १७.०१.२०१७ ला शुध्दीपत्रक काढले की, वरील समावेश केलेली अट रद्द करून इतर अटी मध्ये कोणताही

बदल केला नाही. माझा असा आरोप आहे की, ठराविक एका व्यक्तीला टेंडर द्यायचे होते म्हणून ही सर्व कार्यवाही केली का? टेंडर उघडण्याअगोदर ६७(३) क मध्ये संबंधीतांस टँकरने पाणी पुरवठा करण्याची ऑर्डर देऊन टाकली हे कितपत योग्य आहे. जे टेंडर आले ते चारही अपात्र ठरलेले आहेत. तरी सुध्दा त्या ठेकेदारास काम का देण्यात आले? ज्यांना काम दिले, ती एजन्सी सातारा मध्ये पाणीपुरवठा करते त्यांचेकडे टँकर किती आहे? किती पाणी देते? अभ्यास केला होता का? ती एजन्सी पाणी पुरवठा करण्यास सक्षम नाही तर त्याच एजन्सीला १०० टँकरचा पाणीपुरवठा करण्यासाठी काम का दिले? व ज्यांची पार्श्वभुमि गुन्हेगारी स्वरूपाची असेल, त्यांना टेंडर भरता येणार नाही, अशी अट प्रत्येक टेंडरमध्ये टाकतो का? दोन शुध्दीपत्रक काढण्याची वेळ का आली? सर्व माहिती द्यावी.

मा.महापौर :संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री.राजू शिंदे :समांतर एजन्सी व महापालिकेचे प्रकरण मा.न्यायालयात आहे. मा.न्यायालयाचे जैसे थे चे आदेश आहेत. तर टँकरची निविदा काढणे, काम देणेसाठी न्यायालयाची परवानगी घेतली का?

मा.आयुक्त :सध्या पाणीपुरवठा करणे हे काम महापालिका करीत आहे. असे शपथपत्र मा.न्यायालयात सादर केलेले असल्याने तशी परवानगी घेण्याची गरज नाही.

श्री.राजू शिंदे :नियम पाळावेच लागतात. १० हजारचे, १० लक्षचे काम असेल, एखाद्याकडे काही नसेल तर त्यास ६७-३ (क) मध्ये काम देणे योग्य नाही. मनपाच्या नियमानेच काम करावे लागेल. शुध्दीपत्रक का काढले? कशाच्या आधारे काढले? का काढावेसे वाटले?

कार्य.अभि.(श्री.चहल) :जे टेंडर भरणार आहे त्यांची पार्श्वभुमी गुन्हेगारी स्वरूपाची असेल तर त्यांना टेंडर भरता येणार नाही. अट टाकली होती. चांगला गुत्तेदार यावा असा हेतू होता.

श्री.कैलास गायकवाड :अशी अट प्रत्येक टेंडरला करतो का?

श्री.राजू शिंदे :ही अट रद्द करण्यात येते. पुन्हा शुध्दीपत्रक का काढले?

कार्य.अभि.(श्री.चहल) :वकीलाचा अभिप्राय घेतला. चांगले काम व्हावे या हेतूने ती अट टाकली.

श्री.राजू शिंदे :खालचे अधिकारी हे मा.आयुक्त यांना कसे मीस-गाईड करतात? व चुकीच्या पध्दतीने कशी कामे करतात? हे निदर्शनास आणून देत आहे. इतर टेंडर काढले जाते त्यावेळी गुन्हेगारी स्वरूपाचे ते नसावे अशी अट टाकलेली होती का? शुध्दीपत्रक काढण्यास पैसा खर्च झाला असेल तर मनपाचे नुकसान झाले. टेंडर काढतांनाच अट का टाकली नाही? मनमानीपणे कामे होत असतील तर मा.आयुक्तांनी संबंधीतांवर कारवाई करावी.

कार्य.अभि.(श्री चहल) :अभिप्राय घेतला होता. त्यांचा गुन्हा सिध्द झाला नाही परंतु त्यांना पीसीआर झालेला होता. तक्रार आलेली होती.

श्री.राजू शिंदे :याचा अर्थ अधिकारी यांना माहित होते म्हणूनच शुध्दीपत्रक काढले. सर्व मॅनेज करून केले. १०० टक्के अधिकारी दोषी आहेत. दोन शुध्दीपत्रक काढले गरज होती का? ज्यांना काम दिले तो टेंडर मध्ये पात्र नाही तरी सुध्दा काम दिले, हे योग्य नाही.

| | |
|---|---|
| श्री.नंदकुमार घोडेले | :ठेकेदाराला डोळ्यासमोर ठेवून त्यांचे सोयीनुसार हे काम दिले गेले. मा.आयुक्तांची दिशाभुल केली मोठी अनियमितता केली. |
| श्री.राजू शिंदे | :टेंडर दुसऱ्याला जाते म्हणून शुध्दीपत्रक काढून जाहीर केले. त्यानंतर ही बाब अंगलट येईल म्हणून पुन्हा शुध्दीपत्रक काढले. टेंडर काढण्याअगोदरच संबधीत ठेकेदारास काम दिले. ज्यांना काम दिले तो गुत्तेदार टेंडरमध्ये पात्र नाही. तरी काम कसे दिले? जर कामच द्यायचे होते तर चार टेंडर भरणारे यांना काम द्यायला पाहिजे होते. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :यापूर्वी कधीही निविदाधारक यांचे चारित्र्य प्रमाणपत्र मागविले नाही. या निविदेमध्ये का असे झाले? |
| श्री.राजू शिंदे | :मा.आयुक्तांनी अशा अधिकाऱ्यांना पाठीशी घालू नये. जर निविदाधारक पात्र नव्हते तर फेर निविदा काढायला पाहिजे. हर्सुल येथील गाळ काढण्याच्या प्रकरणात जे शेख नावाचे ठेकेदार होते त्यांना हे काम दिले. हर्सुल गाळ प्रकरणात त्या ठेकेदाराने दोन कोटीचे नुकसान केले. |
| कार्य.अभि.(श्री.चहल) | :श्री.शेख यांना पाच कोटीची वर्कऑर्डर दिली नाही. निविदा अंतिम होईपर्यंत काम दिले आहे, असे लिहिले आहे. |
| श्री.राजू शिंदे | :पुढील आदेशापर्यंत काम का दिले? दुसरेही गुत्तेदार होते. त्यांनाही काम द्यायला पाहिजे होते? सातारा-देवळाई येथील पाणीपुरवठ्यासाठी महिन्याचे किती बील होते? |
| कार्य.अभि.(श्री.चहल) | :प्रत्येक महिन्याचे र.रु.२५ लक्ष होतात. र.रु.३.२५ कोटीचे वर्षासाठी टेंडर आहे. |
| श्री.राजू शिंदे | :पाहिजे तेवढा पाणीपुरवठा संबंधीत ठेकेदार करीत नाही. र.रु.२२-२५ लक्षच वर्षाचे बील व्हायला पाहिजे होते. फक्त तीन ट्रिपा दररोज होतात. तरी सुध्दा त्यांना विषेश बाब समोर ठेवून काम दिले गेले. याच ठेकेदाराने हर्सुल तळ्यातील गाळ काढण्यामध्ये २ कोटीचा भ्रष्टाचार केला आहे. या गुत्तेदारास मॅनेज करून हे काम दिले. त्यामुळे संबंधीत अधिकारी यांचेवर कडक कारवाई करावी. प्रशासन या भ्रष्टाचारास पाठीशी घालत असेल तर हे योग्य नाही. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :एवढे मोठे काम ६७-३ क मध्ये देता येते का? किती दिवसासाठी दिले? २७ महिन्यापासून टँकरवर किती खर्च झाला? कंपनीला किती पैसे मनपाने दिले? पुर्वी कंपनीचे रेट काय होते? या ठेकेदारास काम दिले हे रेट किती आहे? मा.आयुक्तांनी त्या ठेकेदारास पाठीशी घातले काय? सविस्तर माहिती व्हावी. |
| कार्य.अभि.(श्री.चहल) | :सप्टेंबर १४ पासून डिसेंबर १६ पर्यंत कंपनीला ९.१६ कोटी खर्च आला आहे. |
| मा.आयुक्त | :कंपनीचे काम चालू होते तेंव्हाचे रेट काय होते? ते पहावे लागेल. |
| श्री.राजू शिंदे | :कंपनीचे रेट काय होते? त्याचेशी घेणे देणे नाही. त्यांनी फसविले होते म्हणून तर समांतर एजन्सीकडील काम काढले. गुत्तेदार डोळ्यासमोर ठेवून काम दिले. अपात्र असतांना त्यास काम कसे दिले? शुध्दीपत्रक का काढले? |
| मा.आयुक्त | :शुध्दीपत्रक यासाठी काढले की, जो पर्यंत गुन्हा सिध्द होत नाही तोपर्यत ते गुन्हेगार नाहीत. त्यांचेवर फक्त गुन्हा दाखल झालेला होता. |
| श्री.राजू शिंदे | :तोच ठेकेदार टेंडर भरील हे कसे माहित होते? शुध्दीपत्रक का काढावेसे वाटले? प्रशासनाची दिशाभूल करून हे काम केलेले आहे. गुन्हा सिध्द झाला |

असता तर त्याला दिलेले टेंडर रद्द करता आले असते. कायद्यातच तशी तरतूद आहे. टेंडरमध्ये अट का टाकली नाही?

मा.आयुक्त :संबंधीतांवर एफआयआर ऑक्टोबरमध्ये व टेंडर नोव्हेंबरमध्ये आलेले आहे. पहिले शुध्दीपत्रक पहावे लागेल की, त्यात अटी शर्ती काय आल्या आहेत? जो पर्यत गुन्हा सिध्द होत नाही. तोपर्यत असे करता येणार नाही.

श्री.राजू शिंदे :पहिले शुध्दीपत्रक काढले नंतर पुन्हा दुसरे शुध्दीपत्रक काढून ती अट विड्रॉल का केली? जर एखादा व्यक्ती गुन्हेगारी स्वरूपाचा असेल तर त्याला दिलेले काम रद्द करता येते सर्व अधिकार आहे. तसेच पात्र नसतांना त्यांना काम का दिले? गुन्हेगारी स्वरूपाचा आहे तर काम देता येते का?

कार्य.अभि.(श्री.चहल) :सप्टेंबर १४ ते ३१ डिसेंबर १६ पर्यंत संबंधीत एजन्सीला ९.६९ कोटी रक्कम दिली आहे.

श्री.राजू शिंदे :अट का टाकली? पुन्हा परत का घेतली? व त्याच व्यक्तीला काम कसे दिले गेले?

कार्य.अभि.(श्री.चहल) :निविदा फायनल झालेली नाही, गुन्हा दाखल झाल्यानंतर हे केलेले होते.

श्री.राजू शिंदे :आणीबाणीच्या परीस्थितीत ६७-३ क वापरता येते. पाणीपुरवठ्यामध्ये या कलमाचा वापर करून र.रु.२.७४ कोटीची कामे दिली. कितीही रक्कमेचे काम असेल टेंडर का काढीत नाही? माझ्या वार्डातील कामासाठी २ महिने टेंडरसाठी लागले. ८० ते ९१ वार्डासाठी तीन-तीन वेळेस टेंडर काढले.

कार्य.अभि.(श्री.चहल) :अनेक वेळा देखभाल दुरूस्तीसाठी टेंडर काढून सुध्दा अंतिम झाले नाही.

श्री.राजू शिंदे :मा.आयुक्तांची दिशाभूल करून ६७-३ मध्ये कामे करून घेतली. तोच प्रकार हे ५ कोटीचे काम दिले. एखाद्या विशिष्ट व्यक्तीला काम देण्यासाठी महापालिका काय करू शकते? हे लक्षात आले. आणीबाणीच्या कामाच्या खर्चाची माहिती स्थायी समिती, सर्वसाधारण सभेला कळवायला पाहिजे, ती दिली नाही. स.पदाधिकारी यांना कळविले नाही. संबंधीत अधिकारी हे भ्रष्टाचारात समाविष्ट आहे. संबंधीत गुत्तेदाराने २० लक्ष देऊन मॅनेज केले. सर्व प्रकरणाची मुख्य लेखा परीक्षक यांचे मार्फत चौकशी करावी. संबंधीतावर कार्यवाही करावी. हे काम थांबविण्यात यावे. मा.न्यायालयाच्या परवानगीची गरज आहे की नाही?

कार्य.अभि. (श्री.चहल) :परवानगीची गरज नाही.

श्री.राजू शिंदे :मनपाचे टँकर आजही कंपनीकडे आहे. काम कंपनी करते टेंडर महापालिका काढते हे योग्य नाही. मा.न्यायालयाचे जैसे थे आदेश आहे.

मा.आयुक्त :जे दोषी असेल त्यांच्यावर कारवाई होईल. कंपनी ५ हजार लि. टँकर २८०० रू. १० हजार लि.चे ३६०० मध्ये देत होते. आता अनुक्रमे १७९५, ३१३० मध्ये आहे.

कार्य.अभि.(श्री.चहल) :संबंधीतावर गुन्हा दाखल झाला म्हणून ती अट टाकली, नंतर असे समजले की गुन्हा सिध्द झालेला नाही.

श्री.नंदकुमार घोडेले :अपात्र ठरलेला गुत्तेदार पुन्हा पात्र कसा होऊ शकतो?

कार्य.अभि.(श्री.चहल) :पहिल्या टेंडरला कागदपत्र दाखल केले, दुसऱ्या टेंडरला दाखल केले नाही, तर अपात्र होऊ शकतो.

श्री.राजगौरव वानखेडे :आतापर्यत समांतर एजन्सीने टँकरसाठी एजन्सीला किती रक्कम दिली?

| | |
|---|---|
| श्री.राजू शिंदे | :पहिले शुध्दीपत्रक काढले, नंतर दुसरे काढले, मा.आयुक्ताच्या निदर्शनास आणून दिले होते का? दिशाभूल करून वेगळे चित्र निर्माण केले. सिस्टीमला बाजूला ठेवून काम केले. त्या गुत्तेदाराची कॅपॅसिटी नाही तरी काम कसे दिले? चार निविदेमध्ये तो पात्र नाही. तरी काम दिले. |
| मा.आयुक्त | :चौकशी १५ दिवसांत होईल. त्यानुसार कार्यवाही करता येईल. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :काम देण्याची जी पध्दत अवलंबिली ती चुकीची झाली. |
| मा.महापौर | :निविदा प्रोसेस केली, ती पारदर्शकपणे झाली नाही. चौकशी १० दिवसात करून कारवाई करावी. |
| श्री.गजानन मनगटे | :टॅंकरला जे बील २७ महिन्यात दिले त्याची ही चौकशी करावी. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :२७ महिन्यात समांतरने एजन्सीला किती रक्कम दिली? |
| मा.आयुक्त | :३ सदस्यीय कमेटी केली जाईल, कंपनी आली तेंव्हापासून टॅंकरवर किती पैसे दिले? किती टॅंकर होते? मनपाकडे आले तेंव्हा पासून किती खर्च होत आहे? सर्व चौकशीत येईल. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :मागिल २७ महिन्यात र.रु.१७.४२ कोटी कंपनीला देण्यात आले. हा जनतेचा पैसा आहे. पब्लीकसाठी पुरवठा केला, मोफत दिले असे दाखवले, मनपाकडून पैसे घेतले. |
| मा.महापौर | :याचीही चौकशी करावी. |
| श्रीमती समीना शेख | :समांतर कडे ११ टॅंकर दिले ते संबंधीत गुत्तेदार वापरत होता. जो नफा मिळणार तोच घेत होता. ते टॅंकर कुठे आहे. संबंधीतावर गुन्हा दाखल करावा. |
| श्री.राजू शिंदे | :मनपाच्या बाबतीत दररोज वेगवेगळ्या बातम्या पेपरला येतात. काम घेण्यास गुत्तेदार तयार नाहीत. टेंडर ३-३ वेळेस रिकॉल होते. अशा वेळेस ६७-३ (क) का वापरत नाही? मा.न्यायालयाचे जैसे-थे चे आदेश काय होते? वाचून दाखवावे. |
| विधी सल्लागार | :दि.०१.१०.१६ रोजी कंपनीचा करार संपुष्टात आला म्हणून त्यांना पत्र दिले. दुसरी नोटीस दिली की, पाणीपुरवठा योजना मनपाने ताब्यात घेतली. हे मा.न्यायालयात सुध्दा सादर केले होते. हीच बाब मा.उच्च न्यायालयात सांगितली होती. कंपनी सांगत होती की, आम्ही पुरवठा करतो. दिनांक ०३.१०.१६ पासून पाणी पुरवठा मनपाने ताब्यात घेतला. ही वस्तुस्थिती आहे. |
| मा.महापौर | :सध्या मनपा पाणीपुरवठा करते. |
| श्री.राजू शिंदे | :जैसे-थे परिस्थिती ठेवा, मा.कोर्टाने सांगितले. टॅंकर कंपनीकडे होते. सातारा देवळाई नंतर मनपात आले. शहराचा पाणीपुरवठा आतापर्यत कोण करीत होते? हर्सुल तलावातील एका व्यक्तीने १४ हजार केबी मीटर गाळ काढला त्यास पैसे दिले नाही. अधिकारी सांगतात पैसे मागू नको. पैसे दिले तर दुसऱ्याला सुध्दा त्याप्रमाणे पैसे द्यावे लागेल मी पैसे देतो. जे की दुसऱ्याला सुध्दा पैसे द्यावे लागेल. तो गुत्तेदार मा.कोर्टात गेला तर एकाला ५० रू प्रमाणे पैसे दिले. तर दुसऱ्याला सुध्दा त्या प्रमाणे पैसे देऊ असे सिध्द करू शकतो. |
| श्रीमती समीना शेख | :टॅंकर मनपास दिले नाही. खराब केले. मनपाचे नुकसान केले. काय कार्यवाही करणार आहे? |

श्रीमती माधुरी देशमुख :सातारा देवळाई लोकसंख्या किती टँकर पाणी किती देतो. एमजीएमला ७० टँकर कोणत्या निकषानुसार देतो?

कार्य.अभि.(श्री.चहल) :७० हजार लोकसंख्या आहे ४ टँकर पाणी देतो. एमजीएमला १० हजार लिटरचे २० टँकर देतो. पहिल्या पासून ते चालू होते. बायलॉजचे दर आहे त्याप्रमाणे देतो. अक्षेप असेल तर बंद करू.

मा.आयुक्त :लोकसंख्येनुसार मागणीनुसार पाणीपुरवठा करतो. सातारा देवळाईसाठी व्यवस्था केली जाईल.

श्री.प्रमोद राठोड :ज्या भागातून पाणी देण्याची मागणी आहे, तेथे दोन दिवसाआड टँकरची व्यवस्था करावी.

श्री.राजू शिंदे :ज्या दराने नागरीकांना पाणी पुरवठा करतो, त्याच दराप्रमाणे एमजीएमला पाणी देतो का? तसे देत असेल तर मनपाचे नुकसान करून घेतो. माझ्या माहिती प्रमाणे १.२० लक्षचे पाणी दररोज एमजीएमला तोट्यात राहून देतो.

मा.महापौर :या सर्व प्रकाराची चौकशी करावी. जेथे नागरीकांची टँकरची मागणी असेल तेथे प्राधान्य द्यावे. नुकसान किती होते चौकशी करावी. मनपाचे नुकसान होईल अशा पध्दतीने त्या संस्थेला किंवा इतरांना पाणी देऊ नये.

श्री.राजगौरव वानखेडे :एकात्मिक आदिवासी विभागाच्या आठ वस्तीगृहास मनपाचे पाणी देतो. कंपनीचे नावाने पाणी जात होते. मनपास पैसा मिळत नसे. मोफत पाणी दिल्याचे दाखविले जात होते. ते पाणी विक्री करून पैसे घेत होते. यात मनपाचे नुकसान झाले. रोजाबाग भागात मागिल वर्षात ३०-४० टँकर दिले असतील परंतु ५३९ टँकर स्लम मध्ये दिल्याची नोंद आहे. याची चौकशी करावी.

श्रीमती संगीता वाघुले :स्लम दलीत भाग असेल तेथे कमीत कमी दरात पाणी टँकर दिले जावे.

श्री.सचीन खैरे :माझ्या वॉर्डात जगदीशनगर व सत्संग कॉलनी येथे लोकांनी टँकर साठी पैसे भरले, त्यांना एक दिवसा आड पाणी मिळाले पाहिजे.

श्री.नंदकुमार घोडेले :काही दिवसांपुर्वी महावितरण कंपनीने मनपाची लाईट कट केली. प्रशासनाला जनतेची माफी मागावी लागली. मनपाचेही दुर्लक्ष झाले मान्य करावे लागेल. पाच दिवस लाईट बंद होते. त्यांच्या डीपी, पोल यांना कर लावावा. जायकवाडीहून पाणी उचलतो त्यास कमर्शियल कर लागला जातो. थकीत रक्कमेवर दंड लावतात. तो आकडा मोठा झाला व रक्कम वाढत गेली. त्यामूळे मोठी थकबाकी झाली. हे प्रकरण मा.कोर्टात गेले तेथे तोडगा काढावा लागला. जायकवाडीचा पाणीपुरवठा खंडीत करू शकतात. त्यांनी पत्र दिले त्या विषयी काय तोडगा काढणार आहे? महावितरणाकडे पाणीपुरवठा, बाधंकाम परवानगी व इतर जी रक्कम घ्यायची आहे ती किती आहे?

श्री.राजू शिंदे :एमएसईबी ही सुध्दा एक संस्था आहे. एलबीटी प्रमाणेच त्यांना कमर्शियल चार्ज लावता येईल. महापालिका ही सेवा देणारी संस्था आहे. एमएसईबी ही सुध्दा एक शासकीय संस्था आहे. जी ॲक्शन त्यांनी घेतली तीच मनपाने घ्यावी. मा.खासदार, मा.आमदार यांना सोबत घेऊन मा.मंत्री महोदय यांना भेटून बीलामध्ये काही तरी कन्सेशन देण्याची मागणी करावी. नसता एलबीटी प्रमाणे चार्ज लावण्यात यावा. महापालिका सुध्दा मा.कोर्टात त्यांच्या विरोधात दाद मागू शकते.

श्रीमती किर्ती शिंदे :महापालिका वापरत असलेले शहरातील सर्व मीटर तपासणी करावे त्यांचा भुर्दंड महापालिकेस पडत आहे.

कार्य.अभि.(श्री.चहल) :एमएसईबीकडून नोटीस आलेली आहे. नोंव्हेंबरचे बील दिले, डिसेंबर व जानेवारीचे देणे आहे.

श्री.राजू शिंदे :जायकवाडीसाठी लागणारी वीज ही ग्रामीण भागातील रेट प्रमाणे विज बिल द्यायला पाहिजे.

मा.आयुक्त :संबंधीतांशी बैठक झाली. दर आठवड्यात बैठक घेणार. डिसेंबर पर्यत र.रु.३२.४ कोटी थकबाकी आहे. हे कमर्शियल रेट लावले आहे. आपली मागणी आहे की, पाणी पुरवठ्याचे जे रेट आहे ते लावावे, ते लावल्यास ९ कोटी येतील. ग्रामीणसाठीचे र.रु.१५.५० कोटी हे कमर्शियल आहे तेच पाणीपुरवठा रेट लावल्यास ०२ कोटीवर येतील. या बाबतीत एमईआरसी मध्ये प्रकरण चालू आहे. नोव्हेंबर पर्यत बील भरले आहे.

श्री.राजू शिंदे :जे पिण्यासाठी पाणी देतो त्यास विजेचे कमर्शियल रेट लावू नये. अशी मागणी करावी.

कार्य.अभि.(श्री.चहल) :कंपनीने नोटीस दिल्यानंतर बैठक झाली. नोंव्हेबर पर्यत पेमेंन्ट दिले आहे. विनंती केली की, विद्युत पुरवठा खंडीत करू नये.

मा.महापौर :पाणीपुरवठ्यासाठी असलेला विद्युत पुरवठा खंडीत होऊ नये याची दखल घ्यावी.

श्रीमती किर्ती शिंदे :कंपनीकडून हस्तांतर केल्यापासून पाणीपट्टी किती वसुल झाली आहे? ज्यांनी भरणा केली नाही ते कशाच्या आधारे घेणार आहे?

कार्य.अभि. (श्री.चहल) :पाच कोटी वसुल झाले. मालमत्ता करासोबत पाणीपट्टी वसुल करणार आहोत.

श्री.विकास एडके :दिनांक २५-१०-१६ ला लोखंडी ट्रि-गार्डसाठी निविदा केली ती पुर्ण झाली का?

मा.आयुक्त :माहिती सध्या नाही. पुढील सभेत दिली जाईल.

श्री.विकास एडके :र.रु.१.१५ कोटीची निविदा होती. त्यापुर्वी १०-१० लक्षची निविदा काढत होतो त्यात नॉर्मस् असे टाकले की शॉप ॲक्ट असेल तर पात्र ठरू शकतो. अशा व्यक्तीला टेंडर देऊ शकतो का? त्यासाठी आयएसओ वगैरे असल्याची गरज नाही का? सदर टेंडर हे क्वॉलीफाईड एजन्सीला दिले नाही.

श्री.दिलीप थोरात :एका वॉर्डात १ लक्षचे ट्रि-गार्ड खरेदीसाठी मा.पालकमंत्री महोदय यांनी निधी दिला होता. ती प्रोसेस होण्यास वेळ लागत आहे. पावसाळ्यापुर्वी ते झाडे लावायला पाहिजे होते. प्लॅस्टीकचे ट्रि-गार्ड स्वस्त मिळतात.

श्री.विकास एडके :निविदा आली ती रू.८५०/- प्रमाणे आलेली आहे. आजचा रेट ते ट्रि-गार्ड रू.३५०/- पर्यत तयार होते. निविदा फायनल झाली नसेल तर रद्द करावी. मनपाचे होणारे नुकसान वाचवावे.

मा.महापौर :दराची तफावत असेल तर नियमानुसार कार्यवाही करावी. संबंधीतांशी चर्चा करून हे रद्द करता येते का ते पहावे. क्वॉलीटी चांगली असावी. जाचक अटी असेल तर काम लवकर होणार नाही. चौकशी करून कार्यवाही करावी.

श्री.विकास एडके :मी पत्र देऊन दि.१९-११-१६ व दि.३०-११-१६ रोजीचे इतिवृत्तांची प्रत सचिवाकडून मागितली होती दिली नाही. मला उत्तर मिळाले की, आजपर्यत महापौर यांची सही झाली नाही. असे असेल तर ते पिठासीन अधिकारी आज

त्यावर सही करू शकतात का? मा.उच्च न्यायालयात पत्र दाखल केले आहे. एक कोर्ट प्रकरण चालू आहे.

मा.महापौर :मा.न्यायालयात पत्र दिले असेल तर कृपया येथे चर्चाच करू नये.

श्री.कैलास गायकवाड :मा.कोर्टाचे काही जेसे थे चे आदेश आहेत का? चर्चा का करू नये?

श्री.विकास एडके :जर त्यावर सही झाली नसेल तर त्या सभांचे कामकाज रद्द करावे.

श्री.दिलीप थोरात :नियमानुसार इतिवृत्त द्यायला पाहिजे. जी वस्तुस्थिती आहे ती सांगावी. कर्मचारी नाही म्हणून इतिवृत्त तयार होत नाही का?

नगरसचिव :स.सदस्य यांनी मागणी केलेल्या इतिवृत्तांवर मा.पिठासीन अधिकारी यांची सही बाकी आहे.

श्री.विकास एडके :इतिवृत्त वेळेवर आले नाही. तर यात खूप काळे कामे होण्याचे चान्सेस असतात. ३-४ सभा होऊन जातात तरी इतिवृत्त मिळत नाही, कुणाच्या लक्षात राहत नाही. जो काही विलंब होत आहे त्या बाबत कारवाई व्हावी.

श्रीमती सीमा खरात :शहरात अनेक ठिकाणी लाईट बंद आहे. या काळात चोऱ्या वगैरे झाल्या आहे ही वेळ का आली? सिडको उड्डाणपुल, उस्मानपुरा, जवाहर कॉलनी येथे दिवसा लाईट चालू असतात. पेपरला आले. मागे बैठक झाली. जेटींग मशीन मिळत नाही. दर शुक्रवारी माझ्या वार्डात लाईट नसतात.

कार्य.अभियंता-विद्युत :सातारा येथे लाईटची अडचण होती. सर्व कॉम्प्रेसिव्ह एजन्सीला दंड लावण्यात आलेला आहे. नियोजन करून लाईट बंद करता येईल. जेटींग मशीन कमी आहे. एक्स्ट्रा देणेसाठी सांगितले होते.

श्रीमती मनीषा मुंडे :माझ्या वार्डात ड्रेनेज लाईन खराब आहे. घाण पाणी येते काम करण्याची मागणी केली कुणीही येत नाही.

कार्य.अभी.(श्री कोल्हे) :जेटींग मशीन बाबत निविदा मंजूर झाली होती

श्री.प्रमोद राठोड :जे उघड्यावर शौच्यास जातात, त्यांना गुलाबाची फुले देतात. त्या भागात ड्रेनेज लाईन नाही. त्यांना टॉयलेट नाही. ड्रेनेज साठी जेटींग मशीन देत नाही. तर त्या लोकांनी जायचे कुठे? ड्रेनेजची कामे ६७-३ (क) मध्ये का होत नाही? लोकांच्या घरांमध्ये पाणी जात आहे दखल घ्यावी. जेटींग मशीन का घेत नाही? त्या भागात पाणी देत नाही. ते लोक आमच्याकडे येऊन सुविधेची मागणी करतात.

श्री.कैलास गायकवाड :मुकूंदवाडी ते शिवाजीनगर रेल्वे ट्रॅक जवळ मुख्य सिवरेज लाईन टाकावी. तेथे अतिक्रमण झाले. ते काढावे. वारंवार मागणी करतो, प्रशासन तेथील उघडयावर जाणाऱ्या लोकांना पुष्पगुच्छ देत आहे यातून काय सिध्द करणार आहे? हे योग्य नाही. त्या भागात ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर जाते. त्या लोकांनी जायचे कुठे? प्रशासन याकडे लक्ष का देत नाही?

श्री.प्रमोद राठोड :या भागात लाईन टाकण्यासाठी अतिक्रमणाचा मुद्दा येतो ते काढावे. पगारीया कॉलनीमध्ये अचानक गेले आणि अतिक्रमण काढायला लागले. लोकांनी उघड्यावर शौचालयास जाऊ नये. अनेक दिवसांपासुन भुमीगत गटारचे काम करीत आहे, तर या भागात लाईट का टाकत नाही? एन-३/४ मध्ये अनेक दिवसापासून नाल्याचा वास येतो. तेथील नागरीक तक्रार करतात. त्यावेळी टारलर शाळेची ड्रेनेज लाईन टाकण्याकरीता कोणता नियम लावला? काही

ठिकाणी टाकता, काही ठिकाणी टाकत नाही. कोणते नियम आहे? ती शाळा त्यांची नाही जागा मनपाची होती, तेथे मागे-पुढे लाईन नाही. मध्येच लाईन टाकली. आमच्या वार्डात दररोजच्या १५-२० तक्रारी आहे.

मा.आयुक्त :मुकूंदवाडीचे जे सांगतात, ती खाजगी जागा आहे. त्यासाठी परवानगी घेऊन अतिक्रमण काढावे लागेल.

श्री.प्रमोद राठोड :एकाही व्यक्तीने कॉम्पनसेशन मागितले नाही. जर पगारीया कॉलनीत जाऊन अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करता, तर इतर ठिकाणी का करीत नाही? कुणीही कॉम्पनसेशन मागण्यास येत नाही. त्यांचेवर गुन्हे दाखल झालेले आहे. इलिगल प्लॉट आहे.

मा.आयुक्त :२०-२५ महिलांचा गट आलेला होता, कॉम्पनसेशनसाठी आले होते, ती मनपाची जागा नाही. खाजगी जागा आहे, कॉम्पनसेशन द्यावे लागेल. ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी अल्टरनेट रूट केले आहे. नगररचना विभागाने मार्कींग केले होते. ४२ प्रॉपर्टी जात आहे. ते लोक माझ्याकडे मोबदल्यासाठी आले होते. नेमकी किती जागा पाहिजे? तेवढीच जागा घेतली तर कमी मोबदला द्यावा लागेल.

श्री.प्रमोद राठोड :कोणत्या निकषानुसार कॉम्पनसेशन देणार? जयभवानीनगरचा रस्ता रूंदीकरण केले त्यांनाही द्यावे. कोणाला कॉम्पनसेशन देणार आहे?

मा.आयुक्त :जयभवानीनगर, ज्योतिबा फुलेनगर व रंगारगल्ली येथे कॉम्पनसेशन दिलेले आहे. ज्योतिनगर मध्ये चार लोकांना प्लॉट पण दिलेले आहे.

मा.महापौर :७/१२ वर एकाचे नाव, बॉण्डवर एकाचे नाव तर कॉम्पनसेशन कोणास देणार?

सहा.संचालक (न.र) :आता जे लोक तेथे आहे जे बेघर होणार आहे. जसे कैलासनगर, घाटी झोपडपट्टी ती लोकांसाठी जशी मदत केली. तशी कार्यवाही करता येईल. ओनरशीपच्या बाबतीतला नंतरचा विषय आहे. रितसर भुसंपादनासाठी कुणी मागणी केली नाही. खाजगी जागा घ्यायची असेल तर ती संपादन करावी लागेल. नंतर काम करता येइल. लिगल कागदपत्र बघून काम करावे लागेल.

श्री.कैलास गायकवाड :लिगल कोणते कागद पाहणार आहे. सातबारा, बाँड, पीआर कार्ड यापैकी कुणाला देणार आहे?

श्री.प्रमोद राठोड :जयभवानीनगर येथील मिळकतीचा पंचनामा केला. त्यांनाही हाच नियम लागू राहणार का? तेथील लोकांना आश्वासन दिले आहे.

सहा.संचालक न.र :जयभवानीनगर येथील कॉम्पनसेशनसाठी कुणी आले नाही. सर्वाना सेम कॅडर राहिल.

श्री.प्रमोद राठोड :विनंती, ड्रेनेज लाईन टाकून द्यावी. तेथील अतिक्रमण काढावे.

मा.महापौर :ज्यांचे घर तेथे आहे, ते सर्वसामान्य नागरीक आहे. त्यांना मदत मिळाली पाहिजे. तेथील सर्वे करून चर्चा करून मोबदला देणार आहे. असे सांगून तेथे ड्रेनेज लाईनचे काम करून घ्यावे. प्रशासनाने सर्व माहिती घेऊन कार्यवाही करावी. अर्धा तासासाठी सभा तहकूब करण्यात येते. (वेळ दु.२.०० वा. पुन्हा सभा ३.०० सुरू)

मा.महापौर :स.सदस्य श्री.विकास एडके यांचा इतिवृत्तांताविषयी प्रश्न होता. नियमानुसार काम करण्यात यावे.

| | |
|---|---|
| श्री.विजय औताडे | :गेल्या १३-१४ महिन्यापासून माझ्या वार्डातील रस्त्याचे अतिक्रमणाचा प्रश्न सुटला नाही. |
| प्रशासकीय अधिकारी | :संबंधीत मिळकतधारकांना २६० ची नोटीस दिली आहे. कलम ४७८ ची नोटीस सुध्दा दिली आहे. १५-२० दुकानदार यांनी मा. कोर्टात सुध्दा गेलेले आहे. |
| श्री.विजय औताडे | :मा.कोर्टात निकाल लागलेला आहे. १५ दिवसाची नोटीस दिली. २४ तासाची नोटीस दिली. काही लोकांनी स्वत:हून काढले आहे. तरी मनपाचा विभाग तेथे जात नाही. |
| मा.आयुक्त | :नोटीस दिली आहे. खाजगी जागा आहे. ते लोक माझेकडे आले. जर आपण ते काढणार असेल, तर तो रस्ता रुंदीकरण व्हायला पाहिजे. ते झाले नाही तर नागरीकांचा रोष मनपावर येतो. स्पेशल निधी आणतो, असे सांगितले होते. तो आणला नाही. |
| श्री.विजय औताडे | :त्या रस्त्याची गरज आहे. नागरीक जागा देण्यास तयार आहे. रस्ता करण्यास पैसे नसतील, तर शासनाकडे मागणी करून बॉण्डवर त्या जागा आहेत. विना मदत ती जागा ताब्यात घ्यावी. ३१ डिंसेबर पर्यत पाडणार होते. दररोज त्या रस्त्यावर अपघात होतात. त्यासाठी लागणारा निधी माझ्या वार्डातील खर्च करावा. |
| मा.आयुक्त | :संबंधीत मिळकतधारक व स.सदस्य व प्रशासन यांची एकत्रित बैठक घेऊन कार्यवाही करू. |
| मा.महापौर | :तातडीने कार्यवाही करावी. |
| श्री.सिताराम सुरे | :जळगाव रोडला लागून ३६ मी. डीपी रस्ता २५ वर्षापासून आहे. किती जागेचे भुसंपादन केले, काहींनी अनधिकृत बांधकाम केले. त्या रस्त्यासाठी १ कोटींचे टेंडर काढले. तेथील अतिक्रमण काढावे. तो रस्ता करावा. ज्यांचेकडून जागा घेतली ते हयात नाही. ज्यांचे सातबारावर नाव आहे. त्यांना मोबदला देणार का? |
| मा.आयुक्त | :टेंडर झाले असेल तर काम होईल. |
| श्री.राजू शिंदे | :सुचना करून सुध्दा ज्यांनी अतिक्रमण काढले नाही. तर काय कार्यवाही करणार? जर अपघात होऊन मृत्यू झाला, तर ३०२ नुसार आयुक्तांवर गुन्हा दाखल होऊ शकतो. |
| मा.आयुक्त | :अतिक्रण होऊन बांधकाम होत असेल, तर कार्यवाही होईल. मा.महापौर यांचेशी या रस्त्याच्या संदर्भात चर्चा झाली. |
| श्री.प्रमोद राठोड | :रस्त्यासाठी पैसे नाही तर विना परवानगी बांधकाम होत असेल तर ते थांबविणार नाही का? ही जबाबदारी कुणाची येते? |
| मा.आयुक्त | :१०० टक्के काम करू. हे बांधकाम १०-२० वर्षापुर्वीचे आहे. |
| श्री.विजय औताडे | :अपघात झाले तर प्रशासनाची जबाबदारी राहिल. |
| श्री.प्रमोद राठोड | :साइड मार्जीनचे बांधकाम केले म्हणून १५ हजार घेतले. पुन्हा तोडण्यास गेले असता, मी पैसे दिले असे तो व्यक्ती सांगतात. |
| मा.महापौर | :प्रशासनाने अतिक्रमण काढावे. रस्ता करावा. |
| कु.यशश्री बाखरीया | :मोतीकारंजा भागात नाल्यावर मोठे अतिक्रमण झाले. या संबंधी निवेदन दिले. कार्यवाही होत नाही. शहागंज चमन जवळ मोठे अतिक्रमण झाले. |

मा.महापौर :स.सदस्य श्री.औताडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नानुसार मार्च-२०१७ पर्यत अतिक्रमण काढावे.

श्रीमती सीमा चक्रनारायण:सुतगिरणी चौकात अतिक्रमण आहे ते काढले जात नाही.

प्रशासकीय अधिकारी :चार वेळेस काढले. सामान ही जप्त केले, पुन्हा झाले, असेल तर काढले जाईल.

श्री.मनोज गागंवे :स्वामीसमर्थ मंदीर शेजारीच अनेक हातगाड्या उभ्या असतात. ते अतिक्रमण हटवावे.

मा.आयुक्त :शहरात असे अनेक ठिकाणी अतिक्रमण आहे. अनेक लोक रस्त्यावर हातगाड्या लावतात, अन्न शिजवितात, विक्री करतात. कार्यवाही केली होती. सायंकाळी ४ ते १० पर्यंत कोणी असेल तर कार्यवाही केली जाईल.

श्रीमती संगीता वाघुले :आरतीनगर, मिसरवाडी भागात एका व्यक्तीने अनधिकृत बांधकाम केले. मी पत्र दिले कार्यवाही होत नाही. ते गुंठेवारी केली असे सांगतात. इतर लोकांचे का गुंठेवारी होत नाही?

मा.आयुक्त :जेथे अतिक्रमण केले काहींना नोटीस दिली आहे. त्याची माहिती घेऊन दिरंगाई झाली असेल तर कार्यवाही होईल.

श्रीमती समीना शेख :नवाबपुरा ते बायजीपुरा रस्त्याचे रूंदीकरण मोहिम हाती घेण्यात आली होती. ते काम थांबले. दोन धार्मीकस्थळे मध्ये येत आहे. केंव्हा काम सुरू होणार आहे? खासगेटचे स्ट्रक्चर ऑडीट झालेले आहे. हेरीटेज कमेटीकडे पाठविले आहे. अहवाल आलेला नाही. दुसरे सिध्देश्वर मंदीराचा प्रश्न आहे.

प्रशासकीय अधिकारी :आरतीनगर येथील अतिक्रमणा बाबत संबंधीतास ३ दिवसांत नोटीस दिली जाईल. त्यानंतर कारवाई होईल. नवाबपुरा ते बायजीपुरा रस्त्यातील सात लोक मा.कोर्टात गेलेले आहे. ते सोडून बाकी असलेले अतिक्रमण काढले आहे. खासगेटच्या संदर्भात समितीकडे पाठविले आहे. अहवाल आला नाही.

सहा.संचालक न.र. :खासगेट संदर्भात हेरीटेज कमेटीकडे हा विषय मांडलेला होता की, वाहतुकीस अडथळा होतो ते तोडण्याची परवानगी द्यावी. त्यांनी सांगितले की, स्ट्रक्चर ऑडीट करा. ट्रॅफिकमुळे ते धोकादायक ठरत असेल तर काढायला हरकत नाही. ऑडीट साठी प्रस्ताव कार्यकारी अभियंताकडे दिला आहे.

कार्य.अभि.श्री कोल्हे :खासगेटचा स्ट्रक्चर अहवाल आर्किटेक्ट मार्फत घेतला आहे. तो कमेटीसमोर ठेवायचा आहे.

मा.महापौर :संबंधीत दोन्ही अधिकारी यांनी चर्चा करून योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.कैलास गायकवाड :मुख्यलेखा परीक्षक यांचे अधिकार व कर्तव्य काय असतात? खुलासा करावा.

नगर सचिव :महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४७ १ मधील (अ) (ब) व (क) मध्ये नगरपालिका मुख्यलेखापरिक्षक यांचे अधिकार व कर्तव्ये दिलेले आहेत. (नगर सचिव हे वाचून दाखवतात)

श्री.कैलास गायकवाड :भुमिगत गटार योजनेच्या कामाचे ऑडीट मुख्यलेखापरिक्षक यांनी १५ दिवसात करावे, असे स्थायी समितीने आदेशीत केले. अद्याप ऑडीट केले नाही. काम चालू आहे असे सांगण्यात येते. या योजनेचे काम चालू झाले. कुठे लाईन टाकत आहे? काम चांगले होत नाही. अनेक तक्रारी होत्या. मुख्यलेखाधिकारी पदाचा चार्ज मुख्यलेखापरिक्षक यांना कोणत्या नियमानुसार दिला?

| | |
|---|---|
| मा.आयुक्त | :प्रभारी सीईओ निलंबीत झाले आपल्याकडे विकल्प कमी आहे. जे बेस्ट उपलब्ध विकल्प आहेत त्यांचेकडे चार्ज दिला आहे. यांना तात्पुरता चार्ज दिला आहे. |
| श्री.कैलास गायकवाड | :तत्कालीन मुख्यलेखाधिकारी श्री.खैरनार यांना मुख्यलेखा परीक्षक यांचा चार्ज दिला होता. कामामध्ये त्रुटया दिसून आल्या. त्यामूळे मा.आयुक्त यांनी त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविले होते. याचा अर्थ सर्वच काम जाणीवपुर्वक मुख्यलेखा परीक्षक यांचेकडे काम देणार का? खर्च तेच करणार लेखापरिक्षण तेच करणार हे योग्य आहे का? |
| मा.आयुक्त | :मुख्यलेखाधिकारी पदाचा चार्ज तात्पुरत्या स्वरूपात त्यांच्याकडे दिला. मा.प्रधान सचिव, लेखा आणि कोषागार यांचेशी चर्चा झाली. लवकरच मुख्यलेखाधिकारी देणार आहेत. तात्पुरती व्यवस्था करण्यात आली आहे. |
| श्री.कैलास गायकवाड | :लेखाधिकारी यांना चार्ज देऊ शकत होतो. यांना किती दिवस हा चार्ज देणार आहे? |
| मा.आयुक्त | :ते पण या प्रकरणात आहे. त्यांनाही नोटीस दिली आहे. |
| श्री.राजू शिंदे | :मुख्य लेखापरीक्षक यांना मा.आयुक्तांच्या अधिकारात पदभार देता येतो का? ते मा.आयुक्त यांचे अंतर्गत येतात का? खुलासा घ्यावा. |
| मा.आयुक्त | :असे कुठे आहे की मुख्य लेखा परीक्षक यांना मुख्यलेखाधिकारी पदाचा चार्ज देता येत नाही. |
| मुख्य लेखापरीक्षक | :नियमाप्रमाणे स्थायी समितीच्या अंतर्गत मुख्य लेखापरीक्षक यांनी काम केले पाहिजे. असे आहे. |
| श्री.राजू शिंदे | :मुख्य लेखापरीक्षक हे मा.आयुक्तांची सुध्दा चौकशी करू शकतात. असे आहे. मा.आयुक्त हे मुख्यलेखापरीक्षक यांना काम देऊ शकत नाही. काम द्यायचे असेल तर स्थायी समिती,महासभेची मान्यता घेऊन काम देऊ शकतात. |
| मा.आयुक्त | :असे कुठेही लिहिले नाही की, मुख्यलेखापरिक्षक यांना सीईओचा चार्ज देता येत नाही. |
| श्री.राजू शिंदे | :मुख्यलेखापरिक्षक यांचे अधिकार व कर्तव्ये यात दिले की, त्याच्या हाताखाली काम करणारे लेखापरिक्षक व सहायक लेखापरीक्षक, लिपीक कर्मचारी हे स्थायी समितीच्या अधिपत्त्याखाली काम करतील, त्यांनी मा.आयुक्तांच्या हाताखाली काम करावे असेही नियमात नाही. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :मुख्यलेखापरिक्षक यांना यापुर्वी कधी मुख्यलेखाधिकारी पदाचा चार्ज दिला होता का? ज्यांना आता चार्ज दिला, त्या कालावधीचे लेखा विभागाचे ऑडीट कोण करणार आहे? |
| श्री.राजू शिंदे | :एका प्रकरणात चौकशी लावली होती, मुख्यलेखापरिक्षक यांना कोणत्या अधिकारात चौकशी करता येते? सिस्टीम बाजूला ठेवून काम करून घेतले जात आहे. मुख्यलेखापरीक्षक यांनी चौकशी करावी. हे त्यांना स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभा सांगू शकेल. नियम काय सांगतो ते सांगावे. |
| मुख्यलेखापरिक्षक | :स्थायी समिती व सर्वसाधारण सभा यांनी आदेश दिले. त्यानुसार लेखापरिक्षण करणे आवश्यक आहे. नियम ६७-३ मध्ये दिले की, जेंव्हा जेंव्हा या अधिनियमात स्पष्ट तसा निर्देश दिले असेल तेंव्हा महापालिकेच्या किंवा स्थायी समितीच्या मंजूरीस अधिन राहून काम करावे. |

श्री.राजू शिंदे :या नियमानुसार आयुक्तांनी चौकशी करण्यापुर्वी मंजूरी घेतली नाही. मुख्यलेखापरिक्षक यांना लेखा विभागाचा चार्ज दिला. त्यांचेकडे चार्ज असे पर्यत त्या कालावधीतील ऑडीट तेच करणार का? हे योग्य वाटत नाही.

मा.आयुक्त :तात्पुरता चार्ज दिला आहे. तोपर्यंत अधिकारी येणारच आहेत.

श्री.राजू शिंदे :मुख्यलेखापरिक्षक चेकवर सही करणार. व्हाऊचरवर सही करणार कुणालाही चुकीने पैसे देऊन टाकले तर काय करणार आहे?

मा.आयुक्त :जर यांचेकडून चूक झाली तर लोकल ऑडीट आहे.

श्री.राजू शिंदे :आठ दिवसाला मुख्यलेखापरिक्षक यांनी ऑडीट केले पाहिजे असे आहे. प्रत्येक वर्षाचे ऑडीट केले पाहिजे. चौकशी दुसऱ्या अधिकाऱ्याकडे द्यायला पाहिजे. चुकीच्या पध्दतीने कामकाज होत आहे.

मा.आयुक्त :त्यांच्याकडे चौकशी दिली तर यात गैर काही नाही. काय काय झाले लक्षात आले.

श्रीमती समीना शेख :मुख्यलेखाधिकारी पदाचा चार्ज प्रभारी दिलेला होता. तो सहा महिन्यापेक्षा जास्त देता येत नाही. त्यावेळी कोणी का ऑब्जेक्शन घेतले नाही?

मा.महापौर :ज्या सुचना सदस्यांनी केल्या नियमानुसार मुख्यलेखापरिक्षक हे पद स्थायी समिती, सर्वसाधारण सभेच्या अंतर्गत येते. तात्पुरते पद दिले आहे. शासनाकडून तातडीने मुख्यलेखाधिकारी पदाचे अधिकारी मागवावे. यापूढे ज्यांना चार्ज द्यायचा असेल त्याबाबतीत स्थायी समिती, महासभेला तसे कळविले पाहिजे.

**<u>विषय क्रमांक ८९३:-</u>** (टिपः- हा विषय इतिवृत्तांत कायम करण्याचा असल्याने प्रथेप्रमाणे सुरूवातीला या ठिकाणी टंकलिखीत करण्यात आलेला आहे.)

गुरुवार दिनांक २९.१२.२०१६ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-३३) तसेच गुरुवार दिनांक १९.०१.२०१७ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-३४) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

मा.महापौर :मंजूर.

**<u>ठराव:-</u>**

गुरुवार दि.२९.१२.२०१६ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-३३) तसेच गुरुवार दिनांक १९.०१.२०१७ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-३४) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभांचे इतिवृत्तांत कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्रमांक ८८०:-</u>** (कार्यकारी अभियंता जलनिःस्सारण विशेष प्रकल्प, महागरपालिका औरंगाबाद)

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

**<u>अहवाल:-</u>** (कार्यकारी अभियंता, जलनिःसारण विशेष प्रकल्प, महानगरपालिका औरंगाबाद यांचेकडील पत्र जा.क्र./मनपा/वॉर्ड-ब/क/इवउबां/५९७/२०१७ दि.१९.०१.२०१७ अन्वये)

अहवाल सादर करण्यात येतो की, देशातील सर्व शहरे हागंदारी मुक्त करुन शहरातील घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान (नागरी) दिनांक ०२ ऑक्टोबर २०१४ पासुन राबविण्यास सुरुवात केली आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी सुरु केली आहे. त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रामध्ये अंतर्गत जे नागरिक उघडयावर शौचास जाण्याची पध्दत वापरतात व ज्या नागरिकांकडे वैयक्तिक शौचालय नाही. फक्त अशाच नागरिकांना सदर योजनेतुन वैयक्तिक शौचालयाच्या

बांधकामासाठी शासना मार्फत रक्कम रुपये १२०००/- प्रति शौचालय एवढे अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर अनुदानामध्ये केंद्र शासनाचा हिस्सा रक्कम रु. ४०००/- व राज्य शासनाचा हिस्सा रक्कम रु.८०००/- इतका आहे. या संदर्भाने सदरील अभियाना अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे कार्यवाही करण्यात येत असून आतापर्यत झालेल्या कामाचा प्रगती अहवाल खालीलप्रमाणे आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत वैयक्तीक शौचालय बांधकामासाठी अनुदानास पात्र लाभार्थ्याची निवड करण्याची कार्यवाही सुरु असून आज पर्यत ४५०६ लाभार्थ्याची निवड करण्यात आलेली आहे. त्यापैकी सुमारे ४३४० लाभार्थ्यास अनुदानाचा पहिला हप्ता रक्कम रु.६०००/- प्रति लाभार्थी इतका त्यांच्या बॅकेच्या खात्यामध्ये RTGS द्वारे जमा करण्यात आलेला आहे. उर्वरीत १६६ पात्र लाभार्थी यांना पहिल्या हफ्त्याची रक्क्म RTGS करणेची कार्यवाही सुरु आहे. आतापर्यत लाभार्थ्यास पहिल्या हप्त्याच्या अनुदाना पोटी एकुण र.रु.२,६०,४०,०००/- इतकी वितरीत करण्यात आलेली आहे.

तसेच आजपर्यंत एकुण २५२९ लाभार्थ्यानी शौचालय बांधकाम पूर्ण केलेले असून ८७५ लाभार्थ्याचे शौचालयाचे बांधकाम सुरु आहे तसेच ९३६ लाभार्थ्यामार्फत शौचालयाचे बांधकाम सुरु करुन घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. बांधकाम पूर्ण केलेल्या २०३८ लाभार्थ्यास अनुदानाचा दुसरा हप्ता रक्कम रु.६०००/- प्रति लाभार्थी इतका त्यांच्या बॅंकेच्या खात्यामध्ये RTGS द्वारे जमा करण्यात आलेला आहे. उर्वरीत ४९१ लाभार्थ्याना दुसऱ्या हफ्त्याची रक्कम RTGS करणेची कार्यवाही सुरु आहे. आतापर्यत एकुण २०३८ लाभार्थ्यास दुसऱ्या हप्त्याच्या अनुदाना पोटी एकुण रक्कम रु.१,२२,२८,००० /- इतकी वितरीत करण्यात आलेली आहे. पहिल्या व दुस-या हप्त्याच्या अनुदाना पोटी एकूण रक्कम रु.३,८२,६८,०००/- इतकी वितरीत करण्यात आलेली आहे.

आजपर्यत एकूण ४४४८ लाभार्थ्याचे फॉर्म तसेच शौचालय बांधकाम पूर्ण झालेल्या २५२९ लाभार्थ्यां पैकी २३१६ लाभार्थ्याच्या शौचालय बांधकामाचे फोटो शासनाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात आलेले आहेत. उर्वरित लाभार्थ्याच्या शौचालय बांधकामाचे फोटो व फॉर्म अपलोड करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच शहरातील ज्या भागात open defecation चे प्रमाण जास्त आढळून आले आहे. अशा भागात सर्व्हेक्षण करुन चार स्थळे अनुक्रमे १) आंबेडकरनगर २) मिसारवाडी ३) हर्षनगर फाजलपुरा व ४) शताब्दीनगर या भागात सार्वजनिक वापरासाठी शौचालय बांधणे व केवळ महिलाकरीता एकुण सहा ठिकाणी शौचालय बांधकाम करण्यासाठी महानगरपालिकेने रक्कम रु.१३५.०० लक्षच्या निविदा काढण्यात आलेल्या आहेत. तसेच आणखी चार ठिकाणी Pay & Use तत्वावर सुलभ शौचालय बांधण्यात येणार आहेत. अशी एकुण १४ पब्लीक टॉयलेटची कामे हाती घेण्यात येणार आहेत. या अंतर्गत एकूण १०० बैठकीचे (seats) नियोजन केलेले आहे. कार्यादेश झाल्यानंतर कामे हाती घेण्यात येतील. करिता अहवाल मा.सर्वसाधारण सभेसमोर माहितीस्तव सादर करण्यात येत आहे.

**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी ) तपशिल दिनांक १८/०१/२०१७**

| जनगणना सन २०११-नुसार शौचालय बांधकाम करावयाचे उद्दिष्ट | | वार्ड कार्यालय | | | | | | | ११९९७ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ क्र | तपशिल | अ झोन-१ | क झोन-२ | एन-६ झोन -३ | एन-११ झोन -४ | ब झोन-५ | ई झोन-६ | फ झोन-७ | सातारा झोन-८ | ड झोन-९ | एकुण |

इति.सर्व सा.सभा दिनांक १८-०२-२०१७
(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-३५)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वार्ड अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या | २५८१ | २८१ | १९ | २८२ | ३५६४ | ६०१३ | ५८० | ५१३४ | ४६१ | १८९१५ |
| २ | वार्ड अधिकारीकडून वार्ड अभियंता कडे प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या | २५८१ | २८१ | १९ | २८२ | ३५६४ | ६०१३ | ५८० | ५१३४ | ४६१ | १८९१५ |
| ३ | वार्ड अभियंता यांच्याकडून तांत्रिक तपासणी झालेल्या अर्जाची संख्या | २५८१ | २८१ | १९ | २८२ | ३५६४ | ६०१३ | ५८० | ५१३४ | ४६१ | १८९१५ |
| ४ | वार्ड अभियंताकडून तपासणी होउन अनुदानास पात्र लाभार्थी | ५४२ | ३८ | १९ | १६५ | ९७६ | २०७४ | ४३ | ४५७ | १९२ | ४५०६ |
| ५ | एकुण अपात्र लाभार्थी संख्या | २०३९ | २४९ | ०० | ११७ | २५८८ | ३९३९ | ५३७ | ४६७७ | २६९ | १४४१५ |
| | पहिला हप्ता | | | | | | | | | | |
| ६ | स्टेरिंग कमेटीची मान्यता प्राप्त अर्जाची संख्या | ५४२ | ३८ | १९ | १६५ | ९७६ | २०७४ | ४३ | ४५७ | १९२ | ४५०६ |
| ७ | RTGS झालेल्या लाभार्थ्याची संख्या | ५२६ | ३६ | १७ | १३० | ९७१ | १९९७ | ४२ | ४३९ | १८२ | ४३४० |
| ८ | RTGS न झालेल्या लाभार्थ्याची संख्या | १६ | ०२ | ०२ | ३५ | ०६ | ७८ | ०१ | १८ | १० | १६८ |
| ९ | RTGS च्या कार्यवाही अंतर्गत असलेले | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | दुसरा हप्ता | | | | | | | | | | |
| १० | स्टेरिंग कमेटीची मान्यता प्राप्त अर्जाची संख्या | ३५७ | ११ | -- | -- | ५७९ | ९३५ | ३८ | १६७ | ३४ | २१२१ |
| ११ | RTGS झालेल्या लाभार्थ्याची संख्या | ३४७ | ११ | -- | -- | ५७३ | ८७८ | ३५ | १६१ | ३३ | २०३८ |
| १२ | RTGS न झालेल्या लाभार्थ्याची संख्या | १० | ०० | -- | -- | ०६ | ५७ | ०३ | ६ | ०१ | ८३ |
| १३ | RTGS च्या कार्यवाही अंतर्गत असलेले | ०० | ०० | -- | -- | ०१ | १२८ | ०० | ०० | ४३ | १७२ |
| | अनुदान वितरण | | | | | | | | | | |
| | एकुण प्राप्त अनुदान | | | | | | ५.६६२१ कोटी | | | | |
| | पहिला हप्ता | ४३४० x ६०००/- | | | | | २,६०,४०,०००/- | | | | |
| | दुसरा हप्ता | २०३८ x ६०००/- | | | | | १,२२,२८,०००/- | | | | |
| | एकुण | | | | | | ३,८२,६८,०००/- | | | | |
| १४ | शौचालय बांधकाम पुर्ण झालेल्या लाभार्थ्याची संख्या | - | - | - | - | - | - | - | - | - | २५२९ |
| १५ | शौचालय बांधकाम सुरु असलेली संख्या | - | - | - | - | - | - | - | -- | - | ८७५ |
| १६ | शौचालय बांधकाम सुरु | | | | | | | | | | ९३६ |

इति.सर्व सा.सभा दिनांक १८-०२-२०१७
(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-३५)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | न झालेले | | | | | | | | | | |
| १७ | अपलोड झालेले फॉर्म | - | - | - | - | - | - | - | -- | - | ४४४८ |
| १८ | अपलोड झालेले पब्लीक टॉयलेट | | | | | | | | | | २३ |
| १९ | वैयक्तीक शौचालय फोटो अपलोड | - | - | - | - | - | - | - | -- | - | २३१६ |
| २० | फोटो अपलोड न झालेले | | | | | | | | | | २१३ |

मा.आयुक्त :वैयक्तिक शौचालय बांधकाम करण्याचे ७ हजारचे टारगेट होते. २७२१ झाले पहिला हप्ता दिला, आता दुसरा देत आहे. मार्च पर्यत पुर्ण महाराष्ट्रातील शहरे ओडीएफ करायचे, असे आश्वासन मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिले आहे. या संदर्भात राज्य स्तरावर विभागीय स्तरावर बैठका झाल्या. शहराची योग्य परिस्थिती नसल्यामूळे विशेषत: शासनाने मराठवाड्यावर जास्त लक्ष केंद्रीत केलेले आहे. ४५ दिवसाचा कालावधी अजून आहे. ५० ठिकाण असे आहे की, तेथे लोक उघड्यावर टॉयलेटसाठी जातात. ११ ठिकाणी ओडीएफ केले मार्च पर्यत पुर्ण काम करण्याचा प्रयत्न असेल. राजनगर, मुकूंदवाडी भागात काही लोकांची मागणी की, ड्रेनेज लाईन टाकून द्यावी. बाकी शहरामध्ये सेफ्टी टँक व वैयक्तिक टॉयलेटचे काम केले आहे. काही ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकता येत नाही. तरी सुध्दा मनपा किंवा दलित वस्ती सुधार योजनेच्या निधीच्या माध्यमातून कार्यवाही करीत आहे. राजनगर भागात पाहणी केली. रेल्वे ट्रॅकच्या दोन्ही बाजुला ड्रेनेज लाईन टाकण्याची मागणी नागरीकांनी केली. परंतु, ते काम युआयडीएसएसएमटीमध्ये आले नसल्याने ते मुलभुत सुविधांमध्ये र.रु.२.०५ कोटी शिल्लक असल्याने त्यास मान्यता द्यावी. त्यातून या भागात काम करता येईल. जसे मिसरवाडी असेल अशा भागात दलित वस्ती सुधार योजनेतून मनपा फंडातून काम करीत आहोत. पुर्ण सिटी ओडीएफ व्हायला पाहिजे. हा उद्देश या मागे आहे. मार्च पर्यत पुर्ण सिटी ओडीएफ करणार आहे.

श्री.गजानन बारवाल :यात चार ठिकाणी सार्वजनिक शौचालय करणार आहे. ते मार्च पर्यत काम होणार का? १०० सिटचे काम आहे.

कार्य.अभि.(ज.नि.वि.प्र.):टेंडर काढले आहे. वर्क ऑर्डर करणार आहे. जागा उपलब्ध आहेत. मार्च पर्यत काम करणार आहे.

श्रीमती संगिता वाघुले :वैयक्तिक शौचालयाचा पहिला हप्ता दिला जातो. दुसरा हप्ता दीड महिन्यात देणे आवश्यक आहे. परंतु ७-८ महिन्यानंतर तेथे फोटो काढण्यासाठी येतात तोपर्यत काही लोक शैचालय बांधतात. सर्वेला जाणारे कर्मचारी सांगतात की, जुने शौचालय दाखवले. दुसरा हप्ता मिळत नाही.

मा.आयुक्त :४२९ टॉयलेटचा दुसरा हप्ता देण्यासाठी थांबलेले आहे. काही ठिकाणी फोटो घेतले नाही. काही ठिकाणी इतर अडचणी आहे. पुढील दहा दिवसात त्यांचे पैसे दिले जातील. मार्च पर्यत काम पुर्ण केले जाईल.

श्री.नंदकुमार घोडेले :१२ हजार मध्ये काम होत नाही. आणखी वाढीव ८ हजार द्यावे तसेच ज्या सेवाभावी संस्था असेल ते विना मुल्य काम करून देत असेल तर त्यांना चर्चेसाठी बोलवावे.

| | |
|---|---|
| श्री.राजू शिंदे | :ज्यांनी मागणी केली त्यांना शौचालय द्यावे. ज्यांचे नादुरूस्त आहे त्यांना योजनेत समावेश करून घ्यावे. |
| मा.महापौर | :केंद्र शासनाची ही योजना आहे. अटी शर्ती न ठेवता सर्वांना ही योजना लागू करावी व लवकरात लवकर काम करून घ्यावे.हा विषय मंजूर करण्यात येतो. |
| श्री.राजू शिंदे | :सातारा-देवळाई येथे सुध्दा १००-२०० घरासाठी एक ड्रेनेज लाईन टाकून एकच सेफ्टी टँक करता येत असेल तर तशी कार्यवाही करावी. एक एक भागाचे एकत्रित लाईन करून सेफ्टी टँक करावे. जेणे करून जागो जागी टँक करण्याची गरज पडणार नाही व दुषित पाणीही निघणार नाही. |
| मा.आयुक्त | :चांगले सजेशन आहे. १०-१२ लोकांनी एकत्रित येऊन सेफ्टी टँक केले तर योग्यच आहे. सर्व वार्ड अधिकारी यांना सुचना देतो की, जे नादुरूस्त टॉयलेट असतील ते या योजनेच्या माध्यमातून कसे दुरूस्त करता येईल. त्याची काळजी घ्यावी. |

**ठराव:-**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा सादर केलेल्या अहवालास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८८१:-** **(कार्यकारी अभियंता, वॉर्ड अ,क व ड)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४९, औरंगपुरा, भाजी मंडई ते बारुदगरनाला पर्यंत रस्त्याचे White Topping करणे. या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१५-१६ च्या दरसुचीनूसार रक्कम रुपये ९४,६३,२५४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन २०१६-१७ च्या सुधारित अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध करून घेऊन करण्यात येईल.

तरी या कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रु.९४,६३,२५४/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

| | |
|---|---|
| मा.महापौर | :मंजूर. औरंगपुरा, पाठक फोटो स्टुडिओ, भाजी मंडई पासून हा रस्ता घ्यावा. |
| श्री.गजानन बारवाल | :व्हाईट टॉपींगचे रस्त्याची कोठे कामे चालू आहे. कोणत्या रस्त्याची कामे हाती घेणार आहे माहिती द्यावी. मंजूरीस हरकत नाही. |
| श्री.गंगाधर ढगे | :पंचवीस वर्षात या रस्त्याचे काम झाले नाही. |
| श्री.विकास एडके | :पाठक फोटो स्टुडिओ पासून हा रस्ता घ्यावा. |
| मा.महापौर | :दुरूस्तीसह मंजूर. इतर वार्डातही अशी कामे करण्याबाबत प्रस्तावित करावे. |

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४९, औरंगपुरा, पाठक स्टुडिओ, भाजी मंडई ते बारुदगरनाल्यापर्यंतच्या रस्त्याचे White Topping करणेच्या कामाचे र.रु.९४,६३,२५४/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८८२:-** **(कार्यकारी अभियंता, जलनि:सारण प्रकल्प)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भारतीय विमान सेवा प्राधिकरण यांच्या मार्फत सी.एस.आर.अंतर्गत महानगरपालिकेच्या एकूण १९ शाळांमध्ये २७ स्वच्छतागृहाचे बांधकाम करण्यात येणार आहे. यासाठी सा.बा.खात्याच्या सन-२०१३-१४ च्या जिल्हा दरसुची नुसार र.रु.८३,५३,८००/-चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले त्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदरील

कामासाठी भारतीय विमान सेवा प्राधिकरण यांच्या मार्फत निधी प्राप्त झाल्यानंतर निविदा प्रक्रिया करण्यात येईल.

त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक र.रु.८३,५३,८००/-चा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल :१९ शाळा निवडल्या. तेथे यापुर्वी स्वच्छतागृह नव्हते का?

श्री.नंदकुमार घोडेले :इतर शाळातही मुलीसाठी शौचालयाची व्यवस्था करावी.

श्री.राजू शिंदे :ज्यांनी निधी दिला. त्यांचे अभिनंदन करावे. तसे पत्राने त्यांना कळवावे.

मा.महापौर :मंजूर

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भारतीय विमान सेवा प्राधिकरण यांच्या मार्फत सी.एस.आर.अंतर्गत महानगरपालिकेच्या एकूण १९ शाळांमध्ये २७ स्वच्छतागृहाचे बांधकामासाठीच्या र.रु.८३,५३,८००/-च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८८३:-** (आस्थापना अधिकारी-१)

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, विविध प्रकरणांमध्ये अनियमितता आढळून आल्याने निलंबित केलेल्या खालील अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करण्याचे स्वतंत्र प्रस्ताव दिनांक १९.११.२०१६ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात आले होते.

| अ.क्र | अधिकाऱ्यांचे नांव | पदनाम | निलंबित केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | डॉ.बी.एस.नाईकवाडे | संचालक,प्राणी संग्रहालय तथा मुख्य पशुसंवर्धन अधिकारी | १९.०३.२०१६ |
| २. | श्री.डी.पी.कुलकर्णी | सहाय्यक संचालक नगर रचना | १८.०४.२०१६ |
| ३. | श्री.एस.डी.रामटेके | उप अभियंता | १८.०४.२०१६ |
| ४. | श्री.आर.पी.वाघमारे | शाखा अभियंता | १८.०४.२०१६ |
| ५. | श्री.सय्यद फहिमोद्दीन विखारोद्दीन | उप अभियंता (सेवानिवृत्त) | सेवानिवृत्त असल्याने फक्त विभागीय चौकशी |
| ६. | श्री.मोहम्मद वसील | शाखा अभियंता (सेवानिवृत्त) | सेवानिवृत्त असल्याने फक्त विभागीय चौकशी |

वरील पैकी अ.क्र.५ व ६ वरील अधिकारी/कर्मचारी हे सन २०१५ मध्ये सेवानिवृत्त झालेले आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ चे नियम २७(२)(ब)(दोन) नुसार विभागीय चौकशीची कार्यवाही करण्यापूर्वीच्या चारपेक्षा अधिक वर्षाच्या कालावधीत घडलेल्या घटनेसंबंधातील ती असता कामा नये. सदर प्रकरणांत घडलेली अनियमीतता ही सन २०१३ मधील असल्याने विभागीय चौकशीची कार्यवाही करता येते.

करीता, उपरोक्त अ.क्र.१ ते ६ वर नमुद केलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

श्री.प्रमोद राठोड :याच प्रकारचा ठराव आलेला होता. त्यावेळी असे ठरले की, एकत्रित सर्वांचे प्रस्ताव यावे. त्या ठरावात व या ठरावात काय फरक आहे?

नगरसचिव :पुर्वीच्या प्रस्तावाचा कारणापुरता उतारा दिलेला आहे.

मा.आयुक्त :पुर्वीच्या ठरावाचा कारणा पुरता उतारा प्रशासनाला उशीर मिळाला. त्यापुर्वीच हा विषय सभेसमोर येण्यासाठी ठेवलेला होता.

श्री.नंदकुमार घोडेले :किती अधिकारी निलंबीत आहे. कितीचे प्रकरण सभागृहासमोर आलेले आहे?

उपआयुक्त-आस्थापना :माहिती घेऊन सांगावी लागेल.

नगरसचिव :दिनांक ३०-११-२०१६ च्या सभेत ठराव क्रमांक-७९५ नुसार अधिकारी यांची विभागीय चौकशी करण्याचा ठराव झालेला आहे. (वाचून दाखवितात) यात दोन सेवानिवृत्त अधिकारी सुध्दा आहे.

मा.आयुक्त :पुर्वी ठराव दिला होता. कारणा पुरता उतारा परवा मिळाला. त्यापुर्वी हा प्रस्ताव दिलेला होता.

मा.महापौर :हा विषय रद्द करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**विषय क्रमांक ८८४:-** **(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा)**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिका शहरातील ग्राहकांसोबतच जायकवाडी पासून औरंगाबाद पर्यंत व शहरातील मिळून एकूण २३ संस्थांना (Enroute Consumers) पाणी पुरवठा करते. मार्गस्थ ग्राहकांना करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठ्यापोटी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिसुचनेप्रमाणे (Notification), औरंगाबाद महानगरपालिकेच्या मंजुर पाणी पुरवठा व पाणीपट्टी उपविधी-२०११ च्या तरतुदीनूसार तसेच औरंगाबाद महानगरपालिकेने सर्वसाधारण सभा दिनांक ०७.०९.२०११ चे विषय क्र.४२१ मंजुर झालेल्या ठरावानुसार पाणीपट्टीची आकारणी करण्यात येते. मार्गस्थ ग्राहकांमध्ये शहरांतर्गत Militry Engineering Services (MES) यांना महानगरपालिकेतर्फे पाणी पुरवठा करण्यात येतो. एम.ई.एस.संस्थेस आकारण्यात येणाऱ्या पाणीपट्टीचे दर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची अधिसुचना क्र.मजिप्रा/वित्त-२/परिव्यय/२३ दि.१७ जुलै २०१५ च्या दरातील (Retail Supply Domestic (i) Residential) च्या दराने म्हणजेच रुपये ३३/- प्रति १००० लिटर्स या दराने सद्यस्थितीत पाणीपट्टी दरमहा आकारणी करून देयके देण्यात येतात.

मा.कर्नल रामेश्वर शर्मा, स्टेशन सेल, औरंगाबाद (महाराष्ट्र) यांनी पत्र क्र.५१०५/Q दि.१८.११.२०१६ अन्वये एम.ई.एस.संस्थेस आकारण्यात येणाऱ्या पाणीपट्टीचे दर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची अधिसुचना क्र.मजिप्रा/वित्त-२/परिव्यय/२३ दि.१७ जुलै २०१५ या अधिसुचनेप्रमाणे घाऊक पाणी पुरवठा Bulk करीता रु.१४.५० प्रति घन मीटर दरानुसार देयक देण्याची मागणी केली आहे. ठोक पाणी पुरवठ्यासाठी मासिक किमान आकार करार पत्रात नमुद केल्याप्रमाणे राहतील. परंतु असे मासिक किमान आकार प्रत्येक नळजोडास २ द.ल.ली. पाण्याच्या आकारापेक्षा कमी असता कामा नाही असेही नमुद केलेले आहे. महानगरपालिका आणि एम.ई.एस संस्था औरंगाबाद सोबत ४.५ दलली प्रति दिन पाणी पुरवठ्यासाठी करार झालेला आहे. परंतु करारनाम्याप्रमाणे प्रत्यक्षात पाण्याची सद्यस्थिती व उपलब्धता पाहता महानगरपालिका त्यांना हवे तितके पाणी उपलब्ध करून देऊ शकत नाही. महानगरपालिकेकडून MES ला पुरवठा होत असलेल्या पाण्याचे विवरण अवलोकनार्थ स्वतंत्र जोडले आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने विषय क्र.४२१ दिनांक ०७.०९.२०११ अन्वये पाणीपट्टी दरवाढीचा ठराव मंजुर केलेला असून दिनांक ०१.०४.२०१२ पासून “वाढीव पाणीपट्टीचे दर अंमलात आणलेले आहेत. मंजुर ठरावामध्ये वाढीव पाणीपट्टी चालु आर्थिक वर्षापासून म्हणजेच दिनांक ०१ एप्रिल २०१२ पासुन पाणीपट्टी वसुल करण्याचा तसेच शाळा, महाविद्यालये, शासकीय/निमशासकीय कार्यालये, दवाखाने, चॅरीटेबल ट्रस्ट आणि इतर सेवाभावी संस्था इत्यादी यांना व्यावसायीक दराने पाणीपट्टी आकारण्याचा आणि सर्व मार्गस्थ ग्राहकांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे वेळोवेळी निघणाऱ्या परिपत्रकानुसार ठरविण्यात आलेले दर आणि महानगरपालिकेने नवीन आकारणी केलेले

वाढीव दर यापैकी जे दर जास्त असतील त्या दराने मार्गस्थ ग्राहकांकडून पाणीपट्टी आकारण्याची मान्यता झालेली आहे". औरंगाबाद महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा व पाणीपट्टी उपविधी २०११ मध्ये वरील नमुद मंजुर ठरावातील दरानुसार २० वर्षांचे पाणीपट्टीचे दर ठरविण्यात आलेले आहेत.

सध्या महानगरपालिका एम.ई.एस.संस्थेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची अधिसुचना क्र./मजिप्रा/वित्त-२/परिव्यय/२३ दि.१७ जुलै २०१५ च्या दरपत्रकानुसार पाणीपट्टी आकारणी करीत आहे. या अधिसुचनेतील १, घाऊक पाणीपुरवठा जलमापक यंत्राद्वारे (अ) घरगुती (iii) मुख्य वितरण नलिकेतून प्रतिमहा २ द.ल.ली. (प्रतीमाह) पेक्षा जास्त पाणी घेणारे ग्राहकांसाठी रु.१४.५० प्रति १००० लिटर्स या दराने पाणीपट्टीची आकारणी करण्याबाबत समावेश नव्याने करण्यात आलेला आहे. व सदर दर दिनांक ०१.०७.२०१५ पासून लागू करण्यात आलेले आहेत.अशा प्रकारच्या ग्राहकाचा समावेश औरंगाबाद महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा व पाणीपट्टी उपविधीमधील मंजुर पाणीपट्टी दरांमध्ये नाही. तसेच एम.ई.एस. ही संस्था व्यावसायीक संस्था नसून पाण्याचा वापर फक्त निवासस्थानासाठी घरगुती वापरासाठी करतात.

औरंगाबाद महानगरपालिका एम.ई.एस. संस्थेस रेल्वेस्टेशन येथुन मुख्य जलवाहिनीवरून पाणी पुरवठा ३०० मीमी व्यासाच्या मीटरसह जोडणीद्वारे करीत आहे व त्यांचा समावेश घाऊक ग्राहक (Bulk Category) म्हणुन असल्यामुळे संबंधीतांस महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची अधिसूचना क्र./मजिप्रा/वित्त-२/परिव्यय/२३ दि.१७ जुलै २०१५ च्या अधिसुचनेनुसार, १ घाऊक पाणी पुरवठा जलमापक यंत्राद्वारे अ) घरगुती iii) मुख्य वितरण नलिकेतून प्रतिमहा २ द.ल.ली.पेक्षा जास्त पाणी घेणारे ग्राहकांसाठी रुपये १४.५० प्रति १००० लिटर्स या दराने पाणीपट्टीची आकारणी करणे व ठराव मंजुरीनंतर येणाऱ्या महिन्यापासून सुधारित देयके देण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**MES संस्थेस सप्टेंबर-२०१४ पासून करण्यात आलेला पाणी पुरवठा**

| अ.क्र. | महिना | एकूण वापर | |
|---|---|---|---|
| 1. | 01-Sep-2014 to 30-Sep-2014 | 41010 | 41.010 |
| 2. | 01-Nov-2014 to 30-Nov -2014 | 66070 | 66.070 |
| 3. | 01-Jan-2015 to 31- Jan -2015 | 68070 | 68.070 |
| 4. | 01-Feb-2015 to 28-Feb -2015 | 60410 | 60.410 |
| 5. | 01-Mar-2015 to 31- Mar-2015 | 64280 | 64.280 |
| 6. | 01-Apr-2015 to 30- Apr -2015 | 61130 | 61.130 |
| 7. | 01-May-2015 to 31- May -2015 | 65970 | 65.970 |
| 8. | 01-June-2015 to 30- June -2015 | 53410 | 53.410 |
| 9. | 01-July-2015 to 31- July -2015 | 84930 | 84.930 |
| 10. | 01-Aug-2015 to 31- Aug -2015 | 86060 | 86.060 |
| 11. | 01-Sep-2015 to 30- Sep -2015 | 74240 | 74.240 |
| 12. | 01-Oct-2015 to 31- Oct -2015 | 75080 | 75.080 |
| 13. | 01-Nov-2015 to 30- Nov -2015 | 92820 | 92.820 |
| 14. | 01-Dec-2015 to 31- Dec -2015 | 82430 | 82.430 |
| 15. | 01-Jan-2016 to 31- Jan -2016 | 81430 | 81.430 |
| 16. | 01-Feb-2016 to 29- Feb -2016 | 69210 | 69.210 |
| 17. | 01-Mar-2016 to 31- Mar -2016 | 69360 | 69.360 |
| 18. | 01-Apr-2016 to 30- Apr -2016 | - | - |
| 19. | 01-May-2016 to 31- May-2016 | 74330 | 74.330 |
| 20. | 01-Jun-2016 to 30- Jun -2016 | 78520 | 78.520 |

| | | | |
|---|---|---|---|
| 21. | 01-July-2016 to 31- July-2016 | 73290 | 73.290 |
| 22. | 01-Aug-2016 to 31- Aug-2016 | 85800 | 85.800 |
| 23. | 01-Sep-2016 to 30- Sep -2016 | 75780 | 75.780 |
| 24. | 01-Oct-2016 to 31-Oct -2016 | 105290 | 105.290 |
| 25. | 01-Nov-2016 to 30- Nov -2016 | 47110 | 47.110 |

मा.महापौर : मंजूर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका एम.ई.एस. संस्थेस रेल्वेस्टेशन येथुन मुख्य जलवाहिनीवरून पाणी पुरवठा ३०० मीमी व्यासाच्या मीटरसह जोडणीद्वारे करीत आहे व त्यांचा समावेश घाऊक ग्राहक (Bulk Category) म्हणुन असल्यामुळे संबंधीतांस महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची अधिसूचना क्र./मजिप्रा/वित्त-२/परिव्यय/२३ दि.१७ जुलै २०१५ च्या अधिसुचनेनुसार, १ घाऊक पाणी पुरवठा जलमापक यंत्राद्वारे अ) घरगुती iii) मुख्य वितरण नलिकेतून प्रतिमहा २ द.ल.ली.पेक्षा जास्त पाणी घेणारे ग्राहकांसाठी रुपये १४.५० प्रति १००० लिटर्स या दराने पाणीपट्टीची आकारणी करण्यास व येणाऱ्या महिन्यापासून सुधारित देयके देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ८८५:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स्थानिक निधी कार्यालय यांनी सन २००९ ते २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण केलेले आहे का? असल्यास त्यांनी महापालिकेच्या लेखा विभागावर आक्षेप घेतलेले आहे का? त्यात नमुद आक्षेप असा स्वरूपाचे आहेत का? लेखा विभागाने जारी केलेले तथापी खात्यावर पैसे नसल्यामुळे असे धनादेश न वटता परत आल्या बाबत व त्याचप्रमाणे महानगरपालिकेची रोख किर्द (कॅश बुक) सुध्दा वजा असल्याचे त्यात नमुद असून ही त्यावर कोणती कार्यवाही झाली? याची माहिती सभागृहाला देण्यात यावी.

महानगरपालिकेचे कामकाज पारदर्शक रहावे यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५(अ) नुसार स्वतंत्र मुख्य लेखा परिक्षकाची नेमणुक केलेली आहे. वरील स्वरूपाचे आक्षेप व त्रुट्या काढण्याची मुख्य जबाबदारी कोणाची होती? मुख्य लेखा परिक्षक यांची होती का?

वरील कालावधीत महानगरपालिकेत झालेल्या अनियमितता उघडकीस आणणे हे पारदर्शक प्रशासनासाठी आवश्यक असल्यामुळे सन २००९-२०१० ते सन २०१५-२०१६ या काळातील लेखा विभागातील बिल कॅश बुक याचे विशेष लेखा परिक्षण करून सदरील अहवाल मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करणेस्तव प्रस्ताव सादर.

**सुचक:-** श्री.राजु रामराव शिंदे **अनुमोदक:-** श्री.गोकुलसिंग संपतसिंग मलके

श्रीमती समीना शेख :हा प्रशासकीय विषय यायला पाहिजे. सन-२००५ पासून चौकशी करावी यासाठी मॅन-पावर किती खर्च किती येईल सविस्तर यायला पाहिजे. दुरूस्तीसह मंजूर करावे.

श्री.राजू शिंदे :आस्थापना १,२ विभागाचे सुध्दा लेखा परीक्षण २००१ पासून करावे.

मा.महापौर :विषय दुरूस्तीसह मंजूर. पारदर्शकपणे काम झाले पाहिजे. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे तसेच सभागृहात स.सदस्यानी केलेल्या सुचनेनुसार सन २००९-२०१० ते सन २०१५-२०१६ या काळातील लेखा विभागातील बील,कॅश बुक याचे विशेष लेखा परिक्षण

करण्यास व या विशेष लेखापरिक्षणाचा नियमाप्रमाणे अहवाल मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८८६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८२ मधील खालील दर्शविलेल्या कामाचे लेखाशिर्ष बदलण्या बाबतच्या प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | जुने कामांचे नाव | नविन कामांचे नाव |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.८२ अंतर्गत विविध ठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करण्यासाठी रु.१० लक्षाची तरतुद केली आहे.<br>GBR-WARD-EP पान क्र.०४ | १) वॉर्ड क्र.८२ अंतर्गत अंबिकानगर येथे विविध ठिकाणी नविन पाणीपुरवठा लाईन टाकणे. र.रु.१० लक्ष खर्च करण्यात यावेत. |

**सुचक:-** श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप **अनुमोदक:-** श्रीमती अनिता मोहन साळवे
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८२ मधील खालील दर्शविलेल्या कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | जुने कामांचे नाव | नविन कामांचे नाव |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.८२ अंतर्गत विविध ठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करण्यासाठी रु.१० लक्षाची तरतुद केली आहे.<br>GBR-WARD-EP पान क्र.०४ | २) वॉर्ड क्र.८२ अंतर्गत अंबिकानगर येथे विविध ठिकाणी नविन पाणीपुरवठा लाईन टाकणे. र.रु.१० लक्ष खर्च करण्यात यावेत. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८८७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात पान क्र.GBR-Ward: F.P.NO.1, सर्वसाधारण सभेमध्ये शिफारस केलेल्या देखभाल दुरुस्ती व विकास कामे अंतर्गत वॉर्ड-अ ते फ मधील वॉर्ड क्र.१०८ अंतर्गत महानगरपालिका रुग्णालयाचे रंगरंगोटीकरण व इतर देखभाल दुरुस्ती करणे, रक्कम रुपये ७ लाख.

**या कामाऐवजी**

वॉर्ड क्र.१०८ अंतर्गत मजिदिया हॉल ते क्वॉलीटी जनरल स्टोअर्स पर्यंत रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे बाबत. (रक्कम रुपये ७ लाख).

करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोद्दीन **अनुमोदक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात पान क्र.GBR-Ward: F.P.NO.1, सर्वसाधारण सभेमध्ये शिफारस केलेल्या देखभाल दुरुस्ती व विकास कामे अंतर्गत वॉर्ड-अ ते फ मधील वॉर्ड क्र.१०८ अंतर्गत महानगरपालिका रुग्णालयाचे रंगरंगोटीकरण व इतर देखभाल दुरुस्ती करणे, रक्कम रुपये ७ लाख.

**<u>या कामाऐवजी</u>**

वॉर्ड क्र.१०८ अंतर्गत मजिदिया हॉल ते क्वॉलीटी जनरल स्टोअर्स पर्यंत रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे बाबत (रक्कम रुपये ७ लाख) असे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ८८८:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१११, प्रियदर्शनी, इंदिरानगर अंतर्गत दलितवस्ती सुधार योजनेअंतर्गत खालील जागी विकास कामांसाठी निधी उपलब्ध होणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामांचे नाव |
|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१११ अंतर्गत मुख्य रस्त्यावर कॉंक्रीट करणे. र.रु.१५ लक्ष. |
| २. | वॉर्ड क्र.१११ शंभुनगर येथे मुख्य रस्त्यावर कॉंक्रीट करणे. र.रु.२५ लक्ष. |
| ३. | वॉर्ड क्र.१११ अंतर्गत बुध्दविहाराजवळ गल्लीत कॉंक्रीट करणे. र.रु.१५ लक्ष. |
| ४. | वॉर्ड क्र.१११ अंतर्गत विविध गल्ल्यांत कॉंक्रीटींग करणे. र.रु.२५ लक्ष. |
| ५. | वॉर्ड क्र.१११ विविध गल्ल्यांत ड्रेनेज लाईन टाकणे. र.रु.१० लक्ष. |
| ६. | वॉर्ड क्र.१११ अंतर्गत शंभुनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे. र.रु.१० लक्ष. |

**सुचक:-**श्रीमती सलीमा बाबुभाई कुरैशी **अनुमोदक:-**श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी
मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१११, प्रियदर्शनी, इंदिरानगर येथे दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालील विविध विकास कामे करण्यासाठी निधी उपलब्ध होणेस मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामांचे नाव |
|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१११ अंतर्गत मुख्य रस्त्यावर कॉंक्रीट करणे. र.रु.१५ लक्ष. |
| २. | वॉर्ड क्र.१११ शंभुनगर येथे मुख्य रस्त्यावर कॉंक्रीट करणे. र.रु.२५ लक्ष. |
| ३. | वॉर्ड क्र.१११ अंतर्गत बुध्दविहाराजवळ गल्लीत कॉंक्रीट करणे. र.रु.१५ लक्ष. |
| ४. | वॉर्ड क्र.१११ अंतर्गत विविध गल्ल्यांत कॉंक्रीटींग करणे. र.रु.२५ लक्ष. |
| ५. | वॉर्ड क्र.१११ विविध गल्ल्यांत ड्रेनेज लाईन टाकणे. र.रु.१० लक्ष. |
| ६. | वॉर्ड क्र.१११ अंतर्गत शंभुनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे. र.रु.१० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ८८९:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय या कार्यालयामार्फत राज्यातील अल्पसंख्यांक समुदायाचा एकंदर जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी विभागाकडून या योजनेअंतर्गत वॉर्ड क्र.७१ मधील उस्मानपुरा भागाअंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीटींग करणेसाठी र.रु.२५ लक्ष अनुदान मिळणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सरिता अरुण बोर्डे **अनुमोदक:-**श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी
मा.महापौर : मंजूर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७१ मधील उस्मानपुरा भागाअंतर्गत महाराष्ट्र शासन, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय योजनेअंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीटींग करणेसाठी र.रु.२५ लक्ष अनुदान उपलब्ध होणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८९०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९७ मधील खालील दर्शविलेल्या कामाचे लेखाशिर्ष बदलण्या बाबतच्या प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | पान क्र. | जुने कामाचे नाव | नविन कामाचे नाव |
|---|---|---|---|
| ७० | GBR-WARD-F-P.NO.08 | इंदिरानगर, बजरंगनगर सुतगिरणी कॉर्टर अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे. अंदाज पत्रकीय रक्कम रुपये २५ लक्ष फक्त. | १. वॉर्ड क्र.९७ अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. अंदाज पत्रकीय रक्कम रुपये २५ लक्ष फक्त. |
| २८ | GBR-WARD-F-P.NO.12 | सुतगिरणी कॉर्टर, इंदिरानगर, रामकृष्णनगर व बजरंगनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे. अंदाज पत्रकीय रक्कम रुपये ४० लक्ष फक्त. | वॉर्ड क्र.९७ अंतर्गत लक्ष्मीनगर मुख्य रस्ता ते भक्ती बाल रुग्णालया पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. अंदाज पत्रकीय रक्कम रुपये ४० लक्ष फक्त. |

**सुचक:-** श्रीमती सिमा काहानुलाल चक्रनारायण **अनुमोदक:-** श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर : मंजूर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९७ मधील खालील दर्शविलेल्या कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | पान क्र. | जुने कामाचे नाव | नविन कामाचे नाव |
|---|---|---|---|
| ७० | GBR-WARD-F-P.NO.08 | इंदिरानगर, बजरंगनगर सुतगिरणी कॉर्टर अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे. अंदाज पत्रकीय रक्कम रुपये २५ लक्ष फक्त. | १. वॉर्ड क्र.९७ अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. अंदाज पत्रकीय रक्कम रुपये २५ लक्ष फक्त. |
| २८ | GBR-WARD-F-P.NO.12 | सुतगिरणी कॉर्टर, इंदिरानगर, रामकृष्णनगर व बजरंगनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे. अंदाज पत्रकीय रक्कम रुपये ४० लक्ष फक्त. | वॉर्ड क्र.९७ अंतर्गत लक्ष्मीनगर मुख्य रस्ता ते भक्ती बाल रुग्णालया पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. अंदाज पत्रकीय रक्कम रुपये ४० लक्ष फक्त. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८९१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पातील खालील काम रद्द करून प्रभागात आवश्यक असणारे दुसरे विकास काम करणे बाबत लेखाशिर्ष बदलण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामाचे नाव | करावयाचे कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पात एससीआर वार्ड-ई पान क्र.०१ वरील अनुक्रमांक ०६ वर वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत विविध विकास कामे करणे रक्कम रुपये २५.०० लक्ष. | १. वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत ए वन हॉटेल ते हनुमान मंदिरापर्यंत करण्यात आलेल्या व्हाईट टॉपींग रस्त्याच्या दोन्ही बाजूने पेव्हर ब्लॉक बसविणे रक्कम रुपये २५.०० लक्ष. |

**सुचक:-** श्रीमती कमल रामचंद्र नरोटे **अनुमोदक:-** श्रीमती पुष्पा उत्तमराव रोजतकर
मा.महापौर : मंजूर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पातील खालील काम रद्द करून प्रभागात आवश्यक असणारे दुसरे विकास काम करणेस मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामाचे नाव | करावयाचे कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पात एससीआर वार्ड-ई पान क्र.०१ वरील अनुक्रमांक ०६ वर वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत विविध विकास कामे करणे रक्कम रूपये २५.०० लक्ष. | १. वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत ए वन हॉटेल ते हनुमान मंदिरापर्यंत करण्यात आलेल्या व्हाईट टॉपींग रस्त्याच्या दोन्ही बाजूने पेव्हर ब्लॉक बसविणे रक्कम रुपये २५.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८९२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०६, नक्षत्रवाडी मनपा अर्थसंकल्प सन २०१६-२०१७ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | पान क्र. | जुने लेखाशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| ११ | LAY OUT NEW WORK P.NO.10 | वॉर्ड क्र.१०६,गट क्र.११ मंजुर रेखांकनातील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे. र.रु.१० लाख | वॉर्ड क्र.१०६, गट क्र.११ मंजुर रेखांकनातील अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणे. र.रु.१० लाख. |

**सुचक:-** श्रीमती विमल जनार्धन कांबळे **अनुमोदक:-** श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ
मा.महापौर : मंजूर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०६, नक्षत्रवाडी येथे खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | पान क्र. | जुने लेखाशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| ११ | LAY OUT NEW WORK P.NO.10 | वॉर्ड क्र.१०६,गट क्र.११ मंजुर रेखांकनातील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे. र.रु.१० लाख | वॉर्ड क्र.१०६, गट क्र.११ मंजुर रेखांकनातील अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणे. र.रु.१० लाख. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक:-८९३** (हा विषय विषय क्रमांक-८८० च्या पुर्वी घेण्यात आलेला आहे.)

**विषय क्रमांक ८९४:-**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, श्री.प्रमोद कालीचरण खोब्रागडे, स्वीय सहाय्यक तथा तत्कालीन सहा.प्रकल्प अधिकारी यांना राज्य नागरी उपजिवीका अभियानांतर्गत गरीब कुटूंबातील व्यक्तींना प्रशिक्षण देण्याचे प्रकरणी शासन निधीचा अपहार करण्याचा प्रयत्न करणे व इतर अनियमितता निदर्शनास आल्यावरून गुन्हा र.नं.९५/२०१५ नुसार पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आल्याने कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०१५/२५८ दि.१६.०४.२०१५ अन्वये दिनांक १०.०४.२०१५ पासून निलंबीत करण्यात आले होते. तथापि, पोलिस

उपनिरिक्षक, गुन्हे शाखा, औरंगाबाद यांचे दि.२३.०६.२०१६ रोजीचे अहवालानुसार संबंधीतांविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र पाठविणे इतपत सबळ साक्षपुरावा उपलब्ध नसल्याने तसेच ७ वे प्रथम न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद यांनी दि.१९.०७.२०१६ रोजीचे निर्णयान्वये संबंधीतास दोषमुक्त केल्यामुळे कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०१५/१४०५ दि.२९.०८.२०१५ अन्वये कामावर पुनर्स्थापित करण्यात आलेले आहे. तद्नुषंगाने संबंधीतांनी दि.०६.०९.२०१६ रोजीच्या अर्जान्वये त्यांचा निलंबन काळ हा सेवाकाळ ग्राह्य धरण्याबाबत विनंती केली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) आणि ५६(५) (स्पष्टीकरण) प्रमाणे महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त (वेतनश्रेणी पे बँड रु.९३००-३४८०० ग्रेड पे रु.४,४००/-) या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे. अशा अधिकाऱ्यांची नियुक्ती प्राधिकारी व शिस्तभंगाविषयक प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभा आहे.

करीता, श्री.प्रमोद कालीचरण खोब्रागडे,स्वीय सहाय्यक तथा घनकचरा व्यवस्थापक यांची विद्यमान वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० ग्रेड-पे ४,६००/- अशी असून सहाय्यक आयुक्तांपेक्षा उच्च दर्जाची असल्याने त्यांचा दि.१०.०४.२०१५ ते २८.०८.२०१६ (५०६) दिवसांचा निलंबन काळ हा सर्व प्रयोजनार्थ सेवाकाळ गृहीत धरणे व महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वियेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी आणि सेवेतून काढून टाकणे या कलावधीतील प्रदाने) नियम १९८१ चे पोटनियम ७२ (३) व (४) अन्वये निलंबन काळातील सर्व देय वेतन व भत्ते अदा करण्यास प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा.महापौर : मंजूर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पोलिस उपनिरिक्षक, गुन्हे शाखा, औरंगाबाद यांचे दि.२३.०६.२०१६ रोजीचे अहवालानुसार श्री.प्रमोद कालीचरण खोब्रागडे यांचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र पाठविणे इतपत सबळ साक्षपुरावा उपलब्ध नसल्याने तसेच ७ वे प्रथम न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद यांनी दि.१९.०७.२०१६ रोजीचे निर्णयान्वये संबंधीतास दोषमुक्त केल्यामुळे श्री.प्रमोद कालीचरण खोब्रागडे, स्वीय सहाय्यक तथा घनकचरा व्यवस्थापक यांचा दि.१०.०४.२०१५ ते २८.०८.२०१६ (५०६) दिवसांचा निलंबन काळ हा सर्व प्रयोजनार्थ सेवाकाळ गृहीत धरणे व महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वियेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी आणि सेवेतून काढून टाकणे या कलावधीतील प्रदाने) नियम १९८१ चे पोटनियम ७२ (३) व (४) अन्वये निलंबन काळातील सर्व देय वेतन व भत्ते अदा करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ८९५:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीच्या छतावर सौर उर्जेचा वापर करून ८० KWP क्षमतेचे सौर पी.व्ही.प्रकल्प उभारणीच्या कामासाठीचे अंदाजपत्रक महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (MEDA) चे विभागीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासकीय इमारतीवर सदरील सोलार पॉवर यंत्रणा कार्यान्वयीत केल्यामुळे विद्युत बीलात अंदाजे ५०% इतकी बचत होणार आहे. त्यामुळे सदर प्रकल्पाच्या अपेक्षित खर्चाची वसुली तीन वर्षाच्या आत पुर्ण होण्याची शक्यता आहे. तसेच अंदाजपत्रक रक्कमेतून पुढील पाच वर्षापर्यंत साहीत्यासह दुरूस्तीसेवेचा समावेश असल्यामुळे दुरूस्तीसाठी वेगळे प्रयोजन करावे लागणार नाही.

तरी महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारत टप्पा क्र.३ च्या छतावर सोलार पॉवर यंत्रणा कार्यान्वीत करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रु.५३,३२,८००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : मंजूर.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारत टप्पा क्र.३ च्या छतावर सोलार पॉवर यंत्रणा कार्यान्वीत करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रु.५३,३२,८००/-च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८९६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पैठणरोड ते जालाननगर पर्यंतचा औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना सन १९७५ व सुधारीत मंजूर विकास योजना २००१ नुसार १२.०० मीटर रुंद रस्ता प्रस्तावीत आहे. पुढे मंजुर विकास योजना सन १९९१ (वाढीव हद्द) मधील १५.०० मीटर रुंद विकास योजना रस्ता आहे. परंतु या १२.०० मीटर रुंद विकास योजना व १५.०० मीटर रुंद विकास योजना रस्त्याच्या आखणी एकमेकांशी जुळत नाही. सद्यस्थितीमध्ये १२.०० मीटर रुंद विकास योजना रस्त्याच्या पुढे राहुलनगर, सादातनगर मधील जालाननगर ते महानगरपालिका प्राथमिक शाळा बनेवाडी पर्यंत ८ ते ९.०० मीटर रुंद अस्तित्वातील रस्ता आहे व याच रस्त्यावरून सद्या वाहतूक सुरु आहे. हाच ९.०० मीटर रुंद रस्ता १२.०० मीटर रुंदीपर्यंत रुंद करून विकसीत करण्याची मागणी स्थानिक नागरीक व नगरसेवकांनी केली आहे. (Non D.P. Road).

१२.०० मीटर रुंद व ९.०० मीटर रुंद रस्त्याचा टोटल स्टेशन सर्वे करण्यात आलेला असून सदरील अस्तित्वातील रस्त्याची लांबी साधारणतः ४०० मीटर आहे. १२.०० मीटर रुंद विकास योजना रस्त्याच्या पुढे अस्तित्वातील रस्ता असल्याने या अस्तित्वातील रस्त्याचे रुंदीकरण करून तो १२.०० मीटर रुंद करणे योग्य वाटते. त्यामुळे या अस्तित्वातील रस्त्याचे रुंदीकरण करून तो १२.०० मीटर रुंद करणे, तसेच या रस्त्याच्या दोन्ही बाजुच्या मिळकतींचे भुसंपादनाची कार्यवाही करण्याच्या कार्यवाहीस जो खर्च येईल, त्या खर्चासह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल :या रस्त्यामध्ये ज्यांच्या मिळकती जाणार ते गरीब लोक आहे. त्यांना मोबदला न देता पर्यायी जागा द्यावी. दोन्ही बाजूला स्मशानभुमी आहे. रस्ता करणे आवश्यक आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :भुसंपादनासाठी किती खर्च येणार आहे? ते रोख रक्कम घेणार द्यावयाची असेल तर नियोजन काय? मा.न्यायालयाची अडचण येणार नाही का?

मा.आयुक्त :मोबदला देण्याऐवजी त्यांना पर्यायी जागा देणार आहे. कॅश प्रोसेस मध्ये गेल्यास वेळ लागणार आहे. त्या ऐवजी कमीत कमी वेळात कार्यवाही केली तर काम लवकर होईल.

श्री.अब्दुल मं.नाविद :सन-२०१२ मध्ये ठराव क्रमांक ६०६ नुसार मंजूरी मिळाली आहे. जयभीमनगर घाटी मकई गेट रस्त्याची रस्ता रूंदीकरण केले. त्या प्रकारचे या रस्त्याचे काम करावे लागणार आहे. या लोकांना जागेच्या बदल्यात जागा मिळावी मान्यता द्यावी.

श्री.राजू शिंदे :डीपी रोड की नॉन डीपी रोड आहे. करणे आवश्यक आहे का?

मा.आयुक्त :डीपी रोड ज्या ठिकाणी केला, तो एक्झीटींग मध्ये नाही. नॉन डीपी रोड हा एक्झीस्टींगमध्ये आहे. हा महत्वाचा रस्ता आहे. या भागात आग लागली तर गाडी जाऊ शकत नाही, राहूलनगर कडे जाणारा हा एकमेव रस्ता आहे. शेवटच्या ठिकाणी मनपाची शाळा पण आहे. रस्ता रूंद करणे आवश्यक आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :तेथील नागरीकांचे नुकसान होणार नाही. अशी मदत करावी.

मा.महापौर :स.सदस्यांची सुचना लक्षात घेऊन हा प्रस्ताव दुरूस्तीसह मंजूर करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पैठणरोड ते जालाननगर पर्यंतचा औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना सन १९७५ व सुधारीत मंजूर विकास योजना २००१ नुसार या अस्तित्वातील रस्त्याचे नियमाप्रमाणे रुंदीकरण करून तो १२.०० मीटर रुंद करण्यास व रस्त्याच्या दोन्ही बाजुच्या मिळकतींचे भुसंपादनाची कार्यवाही करण्यास तसेच स.सदस्यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे अंमलबजावणी करण्यास तसेच या कार्यवाहीस जो खर्च येईल, त्या खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८९७:-**

सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षात औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ अन्वये फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेला निश्चित करणे आवश्यक असल्याने मालमत्ता कर दर निश्चितीचा प्रस्ताव प्रशासनातर्फे दिनांक १७/०२/२०१७ रोजीच्या स्थायी समिती सभेपूढे विषय क्रमांक १२९ अन्वये सादर करण्यात आलेला होता. सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे, मालमत्ता करांचे दराबाबतच्या प्रस्तावावर सर्व समंतीने निर्णय होणे आवश्यक असल्यामुळे, सर्वसाधारण सभेमध्ये यावर सर्व स.सदस्य चर्चा करून निर्णय घेतील, करीता प्रस्तुत प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस करण्यांत आली.

**प्रशासनाचा मुळ प्रस्ताव खालीलप्रमाणे**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षासाठी महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९९ अन्वये महानगरपालिकेने स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेवुन फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेला निश्चित करणे आवश्यक आहे.

मागील वर्षी २०१६-१७ या आर्थिक वर्षात २०१५-१६ या आर्थिक वर्षाचेच दर कायम करण्यात आले होते. मागील वर्षी कोणतीही कर वाढ करण्यात आलेली नाही. सन २०१७-२०१८ मध्ये कर आकारणी करणेसाठी पूर्वीप्रमाणेच खालील निवासी, निवासेत्तर, व्यावसायीक व औद्योगीक, शैक्षणिक संस्था, भारत सरकारच्या मिळकती, मोबाईल टॉवर्स असे गट करण्यात आलेले आहे. ते पुढील प्रमाणे,

०१. **निवासी** :- राहते घर, -माहिती तंत्रज्ञान वापरासाठी असलेल्या इमारती. (महाराष्ट्र शासनाचे औद्योगीक धोरण परिपत्रक क्र.शासन निर्णय आयटीपी-०३/सीआर-३९११/आयएनडी-७, दिनांक १२-७-२००३ अन्वये माहिती व माहिती तंत्रज्ञान यासाठी मिळकतींचा वापर असल्यास त्यांच्या करात सवलत देणेसाठी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, महाराष्ट्र शासन यांचे नोंदणीकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.) धर्मादाय संस्था, स्वंयसेवी संस्था, सेवाभावी संस्था.

०२. **निवासेत्तर** :- वकीलाचे कार्यालये, कर सल्लागारांचे खाजगी कार्यालये, शैक्षणिक संस्थेशी संलग्न असलेली वस्तीगृहे, स्वतंत्र वस्तीगृहे.

०३. **व्यावसायीक** :- **०१.** पेट्रोलपंप व त्यास संलग्न असलेली खुली जागा, व्यावसायीक दराने खुल्या जागेचे दर वेगळे आकारले जाईल. हॉटेल्स, लॉन्स (लग्न, समारंभासाठी वापरात येणारे लॉन्स) व्यावसायीक वापरासाठी मोकळया जागा, मॉल्स, सर्व प्रकारची दुकाने व शासकीय कार्यालये, डॉक्टरांचे क्लिनीक, खाजगी हॉस्पीटल्स्, कमर्शीयल पेड पार्कींगसाठी व्यावसायीक दराने कर आकारण्यात येईल. तसेच ज्या इमारती व्यावसायीक वापरासाठी भाड्याने दिल्या असतील अशा इमारतीनां सुध्दा व्यावसायीक दराने कर आकारणी करण्यात येईल. **धार्मिक स्थळाच्या जागेवर जर व्यावसायीक वापर होत असेल तर त्यास व्यावसायीक दराने कर आकारणी करण्यात येईल.**

०४. **शैक्षणिक संस्था :- अ)** ज्या शैक्षणिक संस्था अनुदानित आहेत. अशा शैक्षणिक संस्थांना सामान्य कर ३० टक्के व इतर कर निवासेतर दराने आकारण्यात येईल.

**ब)** ज्या शैक्षणिक संस्था विनाअनुदानित आहेत,इंजिनियरींग कॉलेज, मेडीकल कॉलेज अशा शैक्षणिक संस्थांना सामान्य कर ३७.५ टक्के व इतर कर निवासेतर दराने आकारण्यात येईल.

०५. **भारत सरकारच्या मिळकती :-** मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार भारत सरकार व त्यांच्या अंगीकृत असलेली कार्यालये व इतर मिळकती यांना वापरानुसार कर आकारणी करून त्यांना महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या सुविधानुसार एकूण कराच्या ७५ टक्के, ५० टक्के व ३३.३३ टक्के रक्कम सेवा शुल्क म्हणून वसूल करण्यात येईल.

०६. **मोबाईल टॉवर्स** :- टॉवरसाठी भाडयाने घेतलेल्या इमारतीतील जागेचे प्रती माह भाडे नुसार किंवा भाडेपट्टा कररनामानुसार यापैकी जे जास्तीचे असेल त्याप्रमाणे कर आकारण्यात येईल. तसेच बी.एस.एन.एल. व इतर दूर संचार कंपनीचे स्वतःच्या जागेत मोबाईल टॉवर असल्यास अशा मोबाईल टॉवरला तळाचे क्षेत्रफळानुसार रू.९००/- प्रती चौ.मी. प्रती महा दरानुसार कर आकारणी करण्यात येईल. तसेच अनाधिकृत टॉवर्सला मालमत्ता कराची दुप्पट शास्ती लागु राहील.

०७. **औद्योगीक** :- एम.आय.डी.सी., औद्योगीक क्षेत्र इत्यादी.

वरील संज्ञेत मोडत असलेल्या मालमत्तेस सामान्य कराचा दर खालील प्रमाणे राहील.

०८. **सामान्य करा बाबतचा तक्ता** :-

| सामान्य कराचा प्रकार वापराप्रमाणे | सध्याचे सामान्य कराचे दर | प्रस्तावित सामान्य कराचे दर |
|---|---|---|
| १. निवासी (उपरोक्त 'अ' प्रमाणे) | ३०% | ३०% |
| २. निवासेत्तर (उपरोक्त 'ब' प्रमाणे) | ३७.५% | ३७.५% |
| ३. व्यावसायीक (उपरोक्त 'क' प्रमाणे) | ४५% | ४५% |
| ४. औद्योगीक (उपरोक्त 'ड' प्रमाणे) | ३६% | ३६% |
| ५. अनुदानित शैक्षणिक संस्था | ३०% | ३०% |
| ६. विना अनुदानित शैक्षणिक संस्था | ३७.५% | ३७.५% |

०९. **उपभोक्ता कर** :-

घनकचरा व्यवस्थापणेसाठी लागणारा खर्च शहरातील सर्व मिळकत धारकांकडुन उपभोक्ता कर म्हणुन वसुल करण्यासाठी खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**०१** निवासी वापराच्या मिळकतीस रू.१००/- उपभोक्ता कर आकारण्यात येईल.

**०२** निवासेत्तर, व्यावसायीक, शैक्षणिक, औद्योगिक वापराच्या मिळकतीस रू.५००/- उपभोक्ता कर आकारण्यात येईल.

१०. **नामांतर शुल्क** :-

खरेदी विक्री आधारे किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण केलेल्या दस्त / कागदपत्र आधारे नामांतर शुल्क कर योग्य मुल्यावर खालील प्रमाणे आकारण्यात येतील.

| निवासी व व्यावसायीक कर योग्य मुल्य | नामांतर शुल्क | |
|---|---|---|
| | (शहर, सिडको व औद्योगिक भागातील निवासी मिळकतींसाठी) | (शहर, सिडको भागातील व्यावसायीक मिळकतींसाठी) |
| रू. ०१ ते १०,०००/- | रू.१५००/- | रू.३०००/- |

| | | |
|---|---|---|
| रू. १०,००१/- ते ५०,०००/- | रू.४५००/- | रू.९०००/- |
| रू. ५०,००१/- ते पुढे | रू.९०००/- | रू.१८,०००/- |
| **औद्योगिक वसाहतीतील व्यावसायीक मिळकतींसाठी** | | |
| रू.०१ ते ५०,०००/- | | रू.१८,०००/- |
| रू.५०,००१ ते १,००,०००/- | | रू.३०,०००/- |
| रू.१,००,०००/- च्या पुढे | | रू.७५,०००/- |

**११. अदत्त रकमेवरील शास्ती :-**

चालु मागणीचे बिल प्राप्त झाल्यानंतर अशा बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रथम सहामाही देयकाची रक्कम ३० जुन पूर्वी व द्वितीय सहामाही देयकाची रक्कम ३१ डिसेंबर पूर्वी भरणे बंधनकारक आहे. जर कराची रक्कम भरण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने उपरोक्त प्रमाणे कराची रक्कम भरली नाही तर अशा अद्त रकमेबद्दल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण-८ कराधान नियम ४१ अन्वये प्रत्येक महिन्यासाठी कराच्या २ टक्के इतकी रक्कम शास्ती म्हणून द्यावी लागेल.

**११.१ अवैध इमारतीवर शास्ती बसविणे** :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २६७ (अ) नुसार दि.१-४-२००८ पासून अवैध इमारतीवर शास्ती आकारण्यात येते.

उक्त नियमान्वये कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरीत्या बांधकाम करील किंवा पुर्नर बांधकाम करील, तो, अशा अवैध बांधकामाच्या बाबतीत, त्याच्याविरूध्द दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाधा न आणता, ते बांधकाम जोपर्यंत अवैध बांधकाम म्हणून राहील तोपर्यंत दरवर्षी, अशा इमारतीवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असेल.

परंतु, असा कर व शास्ती बसविणे व ती गोळा करणे, यांचा असे अवैध बांधकाम किंवा पुर्नर बांधकाम, ते अस्तित्वात असे तो पर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी ते अवैध बांधकाम किंवा पुर्नर बांधकाम विनियमित झाले आहे असा अन्वयार्थ लावला जाणार नाही, मग असा कालावधी कितीही असो.

(२) पोट कलम (१) अन्वये देय असलेली शास्ती ही, जणू काही शास्तीची रक्कम ही अशा व्यक्तीकडून देय असलेली मालमत्ता कराची रक्कम असल्याप्रमाणे या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये निर्धारीत करण्यात व गोळा करण्यात येईल.

**१२. विशेष सवलती :-**

**१२.१** पाच वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्यास वार्षीक कराच्या सामान्य करात दोन वर्षाची सूट देण्यात येईल.

**१२.२** तीन वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्या एक वर्षातील वार्षीक कराच्या सामान्य करात ५०% सूट देण्यात येईल.

**१२.३** जे मालमत्ताधारक चालु वर्षाचा खालील महिन्यात मालमत्ता कर भरणा करतील त्यांना सन २०१७-२०१८ करीता सामान्य करात पुढील प्रमाणे सूट देय राहील.

| | |
|---|---|
| एप्रिल | १०% |
| मे | ८% |
| जुन | ६% |

जुलै ते मार्च पर्यंतच्या कालावधीत चालु आर्थिक वर्षातील मागणीवर तसेच थकबाकीवर सूट देय राहणार नाही.

१२.४. **आजी / माजी सैनिकांना व स्वातंत्र्य सैनिकांना व त्यांच्या पत्नीच्या नांवे असलेल्या** मिळकतीस मागील वर्षाप्रमाणेच सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात देखील निवासी वापर करीत असलेल्या केवळ एका मिळकतीस सामान्य करात १००%सूट दिली जाईल.

१२.५ जे मालमत्ताधारक आपल्या मिळकतीत सोलर सिस्टीम लावतील त्यांना सामान्य करात चालु वर्षात ५% सुट दहा वर्षापर्यंत कायम ठेवण्यात येईल.

१२.६ जे मालमत्ताधारक आपल्या मालमत्तेस रेन हार्वेस्टींग सिस्टीम (Rain Harvesting System) लागु करतील, अशा मालमत्ताधारकास सामान्य करात २५% सवलत दहा वर्षापर्यंत कायम ठेवण्यात येईल.

१२.७ जे मिळकतधारक नेट बॅकींग, क्रेडीट कार्ड, डेबीट कार्डव्दारे ऑन-लाईन मालमत्ता कराचा भरणा करतील त्यांना अशा मिळकतधारकांना चालु आर्थिक वर्षातील मालमत्ता कराच्या सामान्य करात १% सूट देय राहील.

१३. **<u>कर आकारणी प्रणाली</u>** :-

औरंगाबाद शहराचे वेगवेगळे भाग पाडुन त्याभागातील मिळकतीच्या / जागेचा मुल्यानुसार त्यांचे वाजवी भाडे आकारणी करण्यासाठी विचारात घेण्यात येते. अशा प्रकारचे भाग पाडुन मुल्यांकन हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणका मधील निवासी जागांच्या किंमती विचारात घेवुन औरंगाबाद शहराचे खालील प्रमाणे भाग करणे योग्य होईल. यामुळे औरंगाबाद शहरातील वेगवेगळया भागातील मूल्य (जागेचे) वेगवेगळे मिळवुन त्यानुसार मिळकतीचा स्तर (वर्गीकरण) होवुन त्यानुसार मालमत्ता कर आकारणीसाठी दर आकारणे योग्य राहील.

१३.१ सन २०१० चे महाराष्ट्र शासनाकडील सिध्द शिघ्र गणक (Ready Recknor) आधारे दिनांक ०१-०४-२०१० पासून औरंगाबाद महानगरपालिका हद्यीतील सर्व मिळकतीसाठी चार विभाग हे मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.९८५ दि.२०-२-२०१० नुसार पूर्वी प्रमाणेच करण्यात आलेले होते. त्यानुसार सन २०१२ मध्ये देखील चार भाग करण्यात आले होते.

त्याअनुषंगाने सन २०१६ साठी शिघ्र शिध्द गणकाचे दर शासनातर्फे प्रसिध्द झाल्याने सन २०१५ मधील सिध्द शिघ्र गणकातील दरानुसार अ, ब, क, व ड असे चार भाग होतात. खालील कोणत्या भागात कोणती मिळकत येते, हे तपासता येईल. तसेच दरवर्षी दर बदलले तरी कर आकारणीसाठी हे विभाग पुढील चार वर्षासाठी असेच ठेवण्यात येतील.

| अ. क्र. | विभाग | सन २०१२ च्या विभागानुसार मिळकतीचा सन २०१६-१७ पर्यंतचा प्रचलित दर प्रती चौ.मी. | सन २०१६ च्या विभागानुसार सन २०१७-१८ करीता प्रस्तावित मिळकतीचा दर प्रती चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | अ | रू.१७,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती | रू.४५,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती |
| २ | ब | रू.१३,००० ते रू.१६,९९९/- | रू.३४,९०० ते रू.४४,९९९/- |
| ३ | क | रू.११,००० ते रू.९,९९९/- | रू.३१,७९९ ते रू.३४,८९९/- |
| ४ | ड | रू.८५०० ते रू.१०,९९९/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) | रू.२५,००० ते ३१,८००/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) |

वरील प्रस्तावित दर हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणकामधील घेण्यात आलेले आहे.

इति.सर्व सा.सभा दिनांक १८-०२-२०१७
(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-३५)

**१४. सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षामध्ये कर योग्य मुल्य निश्चित करणेकरीता खालील प्रमाणे वर्गीकरणानुसार व सिध्द शिघ्र गणकानुसार प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर आकारण्यात येत आहे :-**

## निवासी इमारत

**१४.१ निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दरः- (सन २०१६-१७)**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.११/- | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- | रू.६/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.९/- | रू.८/- | रू.७/- | रू.५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.८/- | रू.३/- | रू.२/- | रू.१/- |

**१४.२ सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रतीमाह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१३.७५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.७.५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.८.७५/- | रू.६.२५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१०/- | रू.३.७५/- | रू.२.५/- | रू.१.२५/- |

## निवासेतर इमारत

**१४.३ (अ) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२२/- | रू.२०/- | रू.१८/- | रू.१७/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.७/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१३/- | रू.६/- | रू.३/- | रू.२/- |

**१४.४ (अ) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२७.५/- | रू.२५/- | रू.२२.५/- | रू.१७.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२२.५/- | रू.२०/- | रू.१७.५/- | रू.११.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१८.७५/- | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.८.७५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६.२५/- | रू.७.५/- | रू.३.७५/- | रू.२.५/- |

इति.सर्व सा.सभा दिनांक १८-०२-२०१७
(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-३५)

## अनुदानीत शैक्षणिक संस्था

**१४.५ (ब) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१३/- | रू.११/- | रू.१०/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१२/- | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.११/- | रू.९/- | रू.८/- | रू.७/- |

**१४.६ सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१६.२५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१३.७५/- | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.८.७५/- |

## कायम विना अनुदानीत संस्था

**१४.७ (क) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी कायम विना अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१७/- | रू.१५/- | रू.१४/- | रू.१३/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१६/- | रू.१४/- | रू.१३/- | रू.१२/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१३/- | रू.१२/- | रू.११/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |

**१४.८ सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी कायम विना अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२१.२५/- | रू.१८.७५/- | रू.१७.५/- | रू.१६.२५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२०/- | रू.१७.५/- | रू.१६.२५/- | रू.१५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१८.७५/- | रू.१६.२५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- |

## व्यावसायीक इमारती

**१४.०९ सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. साठी प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२८/- | रू.२६/- | रू.२४/- | रू.२२/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२४/- | रू.२२/- | रू.१९/- | रू.१७/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.२०/- | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- |
| ४ | सिर्मेटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.१०/- |

**१४.१० सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. साठी प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.३५/- | रू.३२.५/- | रू.३०/- | रू.२७.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.३०/- | रू.२७.५/- | रू.२३.७५/- | रू.२१.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.२५/- | रू.२२.५/- | रू.२०/- | रू.१७.५/- |
| ४ | सिर्मेटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.२०/- | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१२.५/- |

**१४.११ औद्योगिक क्षेत्रासाठी दर :-**

| अ.क्र. | बांधकामाचा वर्ग | सन २०१६-१७ साठी प्रचलीत दर | सन २०१७-१८ साठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| | | चौ.मी. | चौ.मी. |
| १ | कारखाना कार्यालय (आर.सी.सी.) | १४.६४ | १८.३० |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | १०.३२ | १२.९ |
| | कारखाना कार्यशाळा (आर.सी.सी.) | ११.६२ | १४.५३ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | ९.०४ | ११.३० |
| २ | **कारखाना परिसरातील कॅन्टीन** | २४.०० | ३० |
| ३ | **गोदाम (आर.सी.सी.)** | ९.६८ | १२.१ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ९.६८ | १२.१ |
| | अर्ध पक्के | ५.८२ | ७.२८ |
| | कच्चे आणि विना छताचे | ३.२२ | ४.०३ |
| ४ | **शेड** | २.५८ | ३.२३ |
| ५ | सायकल स्टॅन्ड | ३.८६ | ४.८३ |
| ६ | **मशिनरी प्लॅन्ट (आर.सी.सी.)** | ११.४० | १४.२५ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ८.८२ | ११.०३ |
| | अर्ध पक्के बांधकाम | ७.१० | ८.८८ |
| | कच्चे बांधकाम | ३.१० | ३.८८ |
| ७ | **निवासी क्षेत्र (आर.सी.सी.)** | १६.१४ | २०.१८ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | १२.९२ | १६.५ |
| | अर्धे पक्के बांधकाम | ११.४० | १४.२५ |
| | कच्चे बांधकाम | ६.४४ | ८.०५ |
| ८ | **सहान जागा** | | |
| | कारखाना वापर | १२.०४ | १५.०५ |
| | रिकामे | ९.०३ | ११.२९ |

**१४.१२ सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी मंजूर रेखांकनातील मोकळया खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रचलीत दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | केवळ मोकळया जागा / निवासी पार्कींग बखळ | रू.३.००/- | रू.२.५०/- | रू.२.००/- | रू.२/- |

**१४.१३ सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी मंजूर रेखांकनातील मोकळया खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रस्तावित दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | केवळ मोकळया जागा / निवासी पार्कींग बखळ | रू.३.७५/- | रू.३.१३/- | रू.२.५/- | रू.२.५/- |

**१४.१४ सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर / व्यावसायीक इमारतीसमोरील असलेल्या मोकळ्या जागेसाठी कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रचलीत दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| २ | विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात असलेल्या मोकळया जमीनी बिगर निवासी प्रकार, लॉन्स, पेट्रोल पंप, गार्डन रेस्टॅारन्ट, इत्यादी | रू.१२.५०/- | रू.१०.५०/- | रू.९.००/- | रू.७/- |

**१४.१५ सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर / व्यावसायीक इमारतीसमोरील असलेल्या मोकळ्या जागेसाठी कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रस्तावित दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| २ | विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात असलेल्या मोकळया जमीनी बिगर निवासी प्रकार, लॉन्स, पेट्रोल पंप, गार्डन रेस्टॅारन्ट, इत्यादी | रू.१५.६३/- | रू.१३.१३/- | रू.११.२५/- | रू.८.७५/- |

**टिप :-** मोकळ्या जागेची आकारणी करतांना फक्त सामान्य कर आकारण्यात येईल.

**१५. मालमत्ता कर आकारणी करणेसाठी सन २०१६-२०१७ साठी प्रचलीत दर व सन २०१७-१८ चे प्रस्तावित दर पुढील प्रमाणे :-**

| अ.क्र. | कराचे नांव | कर योग्य मुल्य रूपये | सन २०१६-१७ साठी प्रचलीत दर | सन २०१७-१८ साठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| १ | सामान्य कर | १. निवासी वापरासाठी | ३० % | ३० % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | ३७.५% | ३७.५% |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | ४५% | ४५% |
| | | ४. औद्योगिक वापर | ३६% | ३६% |
| | | ५. अनुदानित शैक्षणिक संस्था | ३०% | ३०% |
| | | ६. विना अनुदानित शै.संस्था | ३७.५% | ३७.५% |
| २ | साफसफाई कर | १. निवासी वापरासाठी | ३ % | ३ % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | १० % | १० % |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | १० % | १० % |
| | | ४. औद्योगिक वापरासाठी | १०% | १०% |
| ३ | वृक्षकर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | १ % | १ % |
| ४ | अग्निशमन कर | | १.५ % | १.५ % |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | मनपा शिक्षण कर | | २ % | २ % |
| ६ | पथकर | | २ % | २ % |
| ७ | जललाभ कर | | १.५ % | १.५ % |
| ८ | जलनिःसारण कर | | १.५ % | १.५ % |
| ९ | सेवरेज कर | १. निवासी वापरासाठी | १० % | १० % |
| | | २. निवासेत्तर व व्यावसायीक वापरासाठी | १५ % | १५ % |
| | | ३. औद्योगिक वापरासाठी | ५ % | ५ % |
| | | ४. औद्योगिक वसाहतीतील निवासी वापर | १० % | १० % |
| १० | उपभोक्ता कर | निवासी वापरासाठी | १०० प्रती वर्ष | १०० प्रती वर्ष |
| | | निवासेतर / व्यावसायीक वापरासाठी | ५०० प्रती वर्ष---- | ५०० प्रती वर्ष---- |

१६ **शासनाचे कर** :- तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे कर योग्य मुल्यावर आकारण्यात येईल.

करिता, सन २०१७-१८ साठी मालमत्ता कर आकारणी व वसूलीचे दराचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

श्री.गजानन मनगटे :हा विषय महत्वाचा आहे. चर्चा होणे आवश्यक आहे. पुढील सभेत घ्यावे.
श्री.नंदकुमार घोडेले :कर वसुली व कराचे दर निश्चित करणे बाबत विशेष सभा घ्यावी.
मा.महापौर :यासाठी विशेष सभा आयोजित केली जाईल.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत स्वतंत्र बैठकीचे आयोजन करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्रमांक ८९८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे पी.एल.आय.क्रमांक १११/२०१६ अन्वये श्री.काद्री सय्यद ताबिशोद्दीन पिता फसिउद्दीन यांनी औरंगाबाद शहरातील रोषनगेट ते कटकटगेट या १२.०० मीटर रुंद मंजूर विकास योजना रस्ता विकसीत करण्या करीता रिट पिटीशन दाखल केलेली आहे.

रोषनगेट ते कटकटगेट हा रस्ता सन-२००२ च्या सुधारित विकास योजनेनूसार १२.०० मीटर रुंद विकास योजना रस्ता प्रस्तावित आहे. सदर रस्त्यातील मिळकतीचे भुसंपादना करीता १० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने सदरील रस्त्याची भुसंपादन कार्यवाही तीन महिन्याच्या आत सुरु करण्यात येईल असे शपथपत्र मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे सादर करण्यात आलेले आहे.

मा.उच्च न्यायालयात दाखल याचिकेच्या सुनावणीत, कायदेशीर पध्दतीचा अवलंब करून भूसंपादन करणे बाबत प्राप्त आदेशानुसार रोषनगेट ते कटकटगेट या १२.०० मीटर रुंद विकास योजना रस्त्यातील बाधीत मिळकतीचे भुसंपादन मा.जिल्हाधिकारी यांच्याकडून होण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

उक्त विकास योजना रस्त्यात बाधीत होणाऱ्या मालमत्तेचे संपादन मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद पी.एल.आय.क्र.१११/२०१६ मधील आदेशानुसार भुसंपादन कायद्यातहत रितसर कार्यवाही करणेसाठी व त्यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या मंजुरीसह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजूर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.उच्च न्यायालयात दाखल याचिकेच्या सुनावणीत, कायदेशीर पध्दतीचा अवलंब करून भूसंपादन करणे बाबत प्राप्त आदेशानुसार नियमाप्रमाणे रोषनगेट ते कटकटगेट या १२.०० मीटर रुंद विकास योजना रस्त्यातील बाधीत मिळकतीचे भुसंपादन कायद्यातहत रितसर कार्यवाही करण्यास व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८९९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद ते धुळे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११ ची सुधारणा व रुंदीकरणाचे कामाचा राष्ट्रीय महामार्ग विकास प्रकल्प अंतर्गत टप्पा क्र.४ मध्ये अंतर्भाव करण्यात आला असून सदर प्रकल्पाचे खाजगीकरणाअंतर्गत DBFOT तत्वावर चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आले आहे. या प्रकल्पा अंतर्गत भूसंपादन, पर्यावरण ना-हरकत, सेवा वाहिन्या हलविणे व इतर बांधकाम पूर्व प्रक्रियेस सुरुवात झाली असून त्याकरीता मौजे सातारा येथील गट क्रमांक २५० व ३३० मधील एकूण क्षेत्र ६.५९ हेक्टर आर व मौजे देवळाई येथील गट क्र.७३ मधील ५.६३ हेक्टर आर संरक्षित वन क्षेत्र हस्तांतरीत करण्याचे प्रस्तावित आहे. व त्यासाठी प्राधिकरणाने प्रस्ताव तयार करून मा.उपसंरक्षक, वन विभाग, औरंगाबाद यांच्याकडे सादर केलेला आहे. परंतू सदर वन क्षेत्र हस्तांतरीत करण्यासाठी व प्रकल्पासाठीचे ना-हरकत प्रमाणपत्र मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन तसा मा.सर्वसाधारण सभेच्या बैठकीची सुचना, मा.सर्वसाधारण सभेचा ठराव व उपस्थितांची यादी याची प्रत देण्याची विनंती प्रकल्प संचालक, तथा मुख्य प्रबंधक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी केलेली आहे. त्यानुसार मौजे देवळाई येथील गट क्रमांक ७३ मधील ५.६३ हेक्टर आर व मौजे सातारा गट क्र.२५० व गट क्र.३३० मधील एकूण ६.५९ हेक्टर आर संरक्षीत वन क्षेत्र प्राधिकरणास हस्तांतरीत करणेसाठी व या प्रकल्पासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्याच्या मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजूर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद ते धुळे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११ ची सुधारणा व रुंदीकरणाच्या कामाअंतर्गत मौजे सातारा येथील गट क्रमांक २५० व ३३० मधील एकूण क्षेत्र ६.५९ हेक्टर आर व मौजे देवळाई येथील गट क्र.७३ मधील ५.६३ हेक्टर आर संरक्षित वन क्षेत्र भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांना हस्तांतरीत करण्यास व या प्रकल्पासाठी महानगरपालिकेचे ना-हरकत प्रमाणपत्र नियमाप्रमाणे देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९००:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मौजे चिकलठाणा येथील सरकारी मालकीचे गट क्रमांक २१६,२१७ व २१८ हे १९९१ चे मंजुर विकास योजनेनूसार आरक्षण क्रमांक ११ विटभट्टी (Brick Klins) या वापरासाठी आरक्षीत आहे. सदर विकास योजना सुधारीत करण्याचे काम सुरु असून त्या अंतर्गत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ नुसार प्रारूप विकास योजना प्रसिध्द

करण्यात आली होती. त्यात सदर क्षेत्र हे आरक्षण क्रमांक सी-२० पार्क या वापरासाठी प्रस्तावित केलेले आहे.

या आरक्षणाचे एकूण क्षेत्र सुमारे ५० एकर एवढे आहे. मात्र प्रारुप सुधारित विकास योजना प्रसिध्द झाल्यानंतर या कार्यवाहीस मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे आव्हान देण्यात आले असता मा.उच्च न्यायालय यांनी ही कार्यवाही रद्दबातल ठरविली आहे. या निर्णयास सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले असून प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

उपरोक्त आरक्षणाच्या क्षेत्रापैकी ६० आर एवढी गट क्रमांक २१८ मधील उत्तर-पूर्व कोपऱ्यातील शिव रस्त्याला लागून असलेले क्षेत्र महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. (महावितरण) यांना ३३ के.व्ही.उपकेंद्रासाठी देण्यासाठी मंजूर विकास योजनेतील आरक्षणात बदल करावा या बाबत मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी दिनांक २३.०५.२०१६ रोजी पत्र देऊन सूचित केले आहे. या उपकेंद्रांमुळे या सर्वच रहिवाशी, वाणिज्य, औद्योगिक व वैद्यकीय प्रकल्पांसाठी लाभ होणार आहे. ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार गौण फेरबदल करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त बदल हा मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक ११ विटभट्टी (Brick Klins) या आरक्षणा संदर्भाने असून प्रारुप विकास योजना संदर्भाने मा.न्यायालयाचा जो काही निकाल येईल त्यानंतर करावयाच्या कार्यवाही दरम्यान सदर बदलाची दखल घेऊन आवश्यक ते बदल करता येतील. तसेच आरक्षणातील बदला संदर्भात मा.उच्च न्यायालयाचे जे आदेश आहेत (रिट याचिका क्रमांक ५७३०/२००७) त्याबद्दल कायदेशीर सल्ला घेतला असता, प्रकरणात आरक्षण वगळण्याचा प्रस्ताव नसून केवळ आरक्षणाचा उद्देश बदलण्यात येणार आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होत नाही असे अभिप्राय प्राप्त आहेत.

उपरोक्त बाबींचा विचार करून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार गौण फेरबदल प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त :महाराष्ट्र राज्य वितरण कंपनीला उपकेंद्रासाठी ही जागा पाहिजे आहे. सन-२००२ च्या डीपी मध्ये ती आरक्षीत आहे. ३७ नुसार फेरबदल करावा लागेल. जे की सभागृहाची मान्यता असायला पाहिजे.

श्री.नंदकुमार घोडेले :मंजूर करावे. हे सार्वजनिक काम आहे.

श्री.गजानन बारवाल :३७ चे सर्व प्रकरण स्थगित ठेवलेले आहे. हा एकच प्रस्ताव कसा आला?

मा.महापौर :असा बदल करता येतो का? माहिती द्यावी.

प्र.स.संचालक (न.र) :कायदेशीर अभिप्राय घेतला आरक्षण वगळत नाही. परपज चेंज करीत आहे. हि गव्हरमेंट लॅण्ड आहे. आरक्षणास स्टे आहे.

विधी सल्लागार :रिट याचिका ५७३०/२००७ नुसार प्रकरण आहे. ते आरक्षण पब्लीक ॲमेनिटीसाठी व ओपनस्पेस होत्या. त्या डी-रिझर्व करण्यासाठी स्टे देण्यात आला होता. या प्रस्तावानुसार ऑलरेडी आरक्षण आहे. ते चेंज करण्याचा प्रस्ताव आहे.

श्री.गजानन बारवाल :असे अनेक प्रस्ताव आहे. हा एकच प्रस्ताव का आला आहे.

मा.महापौर :सार्वजनिक हिताच्या साठीचा प्रस्ताव आहे विद्युत वितरण कंपनीने मागणी केली आहे. सध्या फंड उपलब्ध आहे. काम करणे आवश्यक आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :सभागृहावर काही येणार नाही. प्रशासनाने योग्य ती नियमाने कार्यवाही करण्यास मंजूरी द्यावी.

मा.महापौर :या प्रस्तावाच्या अनुषंगाने सहा.संचालक नगर रचना, विधी सल्लागार तसेच मा.आयुक्त यांनी सर्व प्रशासकीय कायदेशीर बाबी तपासून घेऊन मा.न्यायालयाचा कुठलाही अवमान होणार नाही. सभागृहावर कुठलाही आरोप होणार नाही याची दखल घेऊन कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मौजे चिकलठाणा येथील सरकारी मालकीचे गट क्रमांक २१६,२१७ व २१८ या क्षेत्रापैकी ६० आर एवढी गट क्रमांक २१८ मधील उत्तर-पूर्व कोपऱ्यातील शिव रस्त्याला लागून असलेले क्षेत्र महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. (महावितरण) यांना ३३ के.व्ही.उपकेंद्रासाठी देण्यासाठी मंजूर विकास योजनेतील आरक्षणात नियमाप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार गौण फेरबदल करण्याकरीता सहा.संचालक नगर रचना, विधी सल्लागार तसेच मा.आयुक्त यांनी सर्व प्रशासकीय कायदेशीर बाबी तपासून घेऊन मा.न्यायालयाचा कुठलाही अवमान होणार नाही. सभागृहावर कुठलाही आरोप होणार नाही याची दखल घेऊन कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९०१:-</u>**

मा.आयुक्त प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५८ च्या पोट कलम (२) अन्वये औरंगाबाद महानगरपालिका पाणी पुरवठा आणि पाणीपट्टी उपविधी-२०११ तयार केले असून सदर उपविधीस दिनांक ०६.०२.२०१४ रोजी महाराष्ट्र शासनाने मान्यता प्रदान करून दिनांक १४.०३.२०१४ रोजी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये प्रसिध्द केले आहेत. हे उपविधी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू झालेले आहेत.

उपविधीतील तरतुदींनसार अनधिकृत नळजोडणी अधिकृत करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत दिनांक ०१.११.२०१४ ते दि.३०.०१.२०१५ या कालावधीमध्ये अभय योजना राबविण्यात आली होती. त्यानंतर अभय योजनेस मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.७८४ दिनांक ०२.०३.२०१५ अन्वये दिनांक ३०.०६.२०१५ पर्यंत मुदतवाढ दिलेली होती. तथापी, या कालावधीत सदर अभय योजनेस नागरीकांचा अल्प प्रतिसाद मिळाल्याने व शहराची वाढती लोकसंख्या, कमी पडणारे पाणी परिमाण लक्षात घेता अनधिकृत नळजोडण्यांवर अंकुश बसावा याकरीता राबविण्यात आलेल्या अभय योजनेस मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.६२ दि.२०.०८.२०१५ अन्वये मंजुर ठरावानुसार दिनांक ३१.१२.२०१५ पर्यंत व त्यानंतर मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.२९९ दिनांक ०७.०१.२०१६ अन्वये मंजुर ठरावानुसार दिनांक ३१.१२.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

तथापी, अद्यापही शहरामध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार मोठ्या प्रमाणात अनधिकृत नळजोडण्या अस्तीत्वात असल्याचे निदर्शनास येत आहे. ऑक्टोबर-२०१६ ते आतापर्यंत ६०० अनाधिकृत नळजोडण्या अधिकृत करण्यात आल्या आहेत. शहरामधील अनाधिकृत नळजोडण्यांची संख्या पाहता, सदरील अनाधिकृत नळजोडण्या अधिकृत केल्यास पाणी चोरी थांबून महानगरपालिकेच्या महसुलामध्ये वाढ होणार आहे. यासाठी अभय योजनेस दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत मुदतवाढ मिळणे व या मुदतीनंतर शहरातील अनधिकृत नळजोडणी धारकांविरूध्द उपविधीतील तरतुदींनूसार कार्यवाही करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल :६०० अनधिकृत नळ जोडणी केली असे म्हटले आहे. हा आकडा चुकीचा असू शकतो. समांतर एजन्सीने अनेक बोगस पावती देऊन नळ कनेक्शन दिले. चौकशी करावी

श्री.नंदकुमार घोडेले :अशा नागरीकांना सुध्दा समावेश करून घ्यावा.त्या नागरीकांचा दोष नाही.

श्री.राजू शिंदे :चार्जेस लावून रेग्युलाइज करणार आहे. काही वस्तीमध्ये पाणी लाईन आहे परंतु ते नळ अनधिकृत आहे. पाणी घेतात. असे रेकॉर्डवर आले पाहिजे. जास्तीचा दंड लावल्यास ते रेग्युलाईज करीत नाही. कमीत कमी रु.५००-१००० दंड लावून रेग्युलाईज करावे. रेकॉर्डवर घ्यावे. ज्यांना समांतर एजन्सीने बोगस पावतीद्वारे नळ दिले असेल तर त्यांचा समावेश या योजनेत करावा. कॅम्प घ्यावा सदस्यांना विश्वासात घ्यावे. ठराविक कालावधी द्यावा. त्यानंतर अमुक चार्जेस लागतील असे जाहिर प्रगटनाद्वारे द्यावे. जेणे करून अनेक लोक नळ रेग्युलाईज करण्यास येतील.

श्री.नंदकुमार घोडेले :वर्तमान पत्रात जाहिर प्रगटन देऊन ठराविक कालावधी ठेवून कार्यवाही करावी.

श्री.सिताराम सुरे :मालमत्ता कर भरल्याची अट नसावी. रू.५००-१०००/- दंड लावून सर्वाना नळ कनेक्शन द्यावे. काहींना कर जास्त लागला आहे. त्यामुळे ते भरत नाही व त्यांना नळही देत नाही.

मा.महापौर :स.सदस्य यांनी दिलेल्या सुचना विचारात घेऊन तसेच जनतेला सुलभ कसे होईल त्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही करावी. जास्त दंड लावल्याने नळ रेग्युलर करण्यास नागरीक पुढे येत नाहीत. कमीत कमी दंड लावून कार्यवाही करावी. ऐनवेळीचे विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरामधील अनाधिकृत नळजोडणी अधिकृत करण्यासाठीच्या अभय योजनेस दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यास तसेच स.सदस्यांनी केलेल्या सुचनांचा विचार करून आवश्यक ती कार्यवाही करण्यास व स.सदस्य यांनी सुचना केल्यानुसार त्याचाही विचार करून योग्य ती कार्यवाही करण्यास व मुदतीनंतर शहरातील अनधिकृत नळजोडणी धारकांविरूध्द उपविधीतील तरतुदींनूसार नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९०२:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील जटवाडा व पहाडसिंगपुरा या परिसरात गवळी समाजाची मोठ्या प्रमाणात वस्ती असून गोगानाथ बाबा टेकडी जवळ ही वस्ती मनपा हद्दीत आहे. या भागातील नागरीकांची शेती ही अहिरमाळेवर असून येथे मागील २०० वर्षापासून वस्ती आहे. परंतु या शेतजमीनीकडे जाण्यासाठी रस्ता नसल्यामुळे त्यांना शेतीकडे जाण्यास मोठ्या प्रमाणात अडचणी येत आहे. सदर शेतीकडे जाण्यायेण्यासाठी या भागातील नागरीक घोडयांचा वापर करीत असून मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करीत आहे. तसेच गोगानाथ बाबा मंदीर येथे हजारो नागरीक दर्शनासाठी येतात. शहराचे आराध्य दैवत असून त्याठिकाणी नागरीकांची नेहमीच वर्दळ असते.

या रस्त्याच्या बांधकामासंबंधी केंद्रीय गृहराज्यमंत्री मा.श्री.हंसराजजी अहीर यांनी औरंगाबाद महानगरपालिकेच्या तत्कालीन आयुक्तांना आदेशही दिले होते व लेखी सुचनाही दिलेल्या आहे.

सदरील शेतजमीन ही अहिरमाळेवर असल्यामुळे व ही जागा शहराच्या हद्दीत असल्यामुळे या ठिकाणी मनपा प्रशासनामार्फत सर्वे करून येथे तात्काळ रस्ता तयार करण्यात यावा. या रस्त्यासाठी केंद्र शासनाकडून अर्थ सहाय्य उपलब्ध होणार आहे. करीता, सदरील प्रस्तावास मंजुरी देण्यात यावी व अर्थसहाय्य मिळणेकरीता केंद्र शासनाकडे पत्रव्यवहार करण्यात यावा. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले **अनुमोदक:-** श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जटवाडा व पहाडसिंगपुरा येथील नागरीकांना अहिरमाळेवर असलेल्या शेतजमीनीवर जाण्या-येण्यासाठी नियमाप्रमाणे मनपा प्रशासनातर्फे सर्वे करून रस्ता तयार करण्यास व सदरील रस्त्यासाठी केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य मिळण्याकरीता पत्रव्यवहार करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९०३:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत वॉर्ड क्र.१०५ मधील राहुलनगर ही दलित वसाहत असून या ठिकाणी मनपातर्फे अंदाजे २०-२२ वर्षापूर्वी सिमेंटचे पाईप असलेली जलवाहीनी टाकण्यात आलेली होती परंतु सध्या ती जलवाहिनी जागो-जागी फार खराब झालेले असल्याने तसेच पुर्वी जलवाहिनी व ड्रेनेजचे पाईप जवळ जवळ टाकल्याने रहिवासीयांना घाण पाणी येत असल्याने त्यांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. सदर ठिकाणचे पाईप लाईन बदलणे अत्यंत आवश्यक आहे या कामास अंदाजे ४० ते ५० लक्ष रुपये पर्यंतचा खर्च अपेक्षित आहे.

करीता, वॉर्ड क्र.१०५ मधील दलित वसाहत राहुलनगर मधील जुनी ए.सी.लाईन काढून नवीन डी.आय.लाईन टाकणेचे काम दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत करण्यासाठी प्रस्ताव मंजुर करून त्या कामाचे मंजुर प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मंजुरीस्तव पाठविणेस प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.अब्दुल नवीद अब्दुल रशीद **अनुमोदक:-** श्रीमती मलेका बेगम हबीब कुरेशी
मा.महापौर :मंजूर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०५ मधील दलित वसाहत राहुलनगर मधील जुनी ए.सी.लाईन काढून नवीन डी.आय.लाईन टाकणेचे काम दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत करण्यासाठीचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९०४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३६, अंतर्गत ब्रिजवाडी परिसरामध्ये भिम दर्शन बौध्द विहारा समोर मनपा उद्यानाची राखीव जागा आहे. परिसरातील नागरीकांना विश्रांतीसाठी आणि भ्रमंती साठी कुठलीही सोय-सुविधा नाही.

तरी, दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ह्या उद्यानाच्या निर्मितीसाठी रुपये ५०,००,०००/- चा निधी उपलब्ध करुन मिळावा.

१) ३० गुंठे परिसरात वेगवेगळी झाडे लावून सुशोभीकरण करणे. जॉगींग ट्रॅक बसविणे. र.रु.२५,००,०००/-.
२) लहानमुलांना खेळण्यासाठी घसरगुंडी, झोका अन्य इतर उपक्रम तसेच संरक्षण भिंत गेट बांधणे. र.रु.२५,००,०००/-.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप **अनुमोदक:-** श्रीमती भारती महेंद्र सोनवणे
मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३६, ब्रिजवाडी येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ह्या उद्यानाच्या निर्मितीसाठी रुपये ५०,००,०००/- चा निधी उपलब्ध होण्यास मंजुरी देण्यात येते.

१) ३० गुंठे परिसरात वेगवेगळी झाडे लावून सुशोभीकरण करणे. जॉगींग ट्रॅक बसविणे. र.रु.२५,००,०००/-.
२) लहानमुलांना खेळण्यासाठी घसरगुंडी, झोका अन्य इतर उपक्रम तसेच संरक्षण भिंत गेट बांधणे. र.रु.२५,००,०००/-.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९०५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ब्रिजवाडी वॉर्ड क्र.३६ च्या परिसरात पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन ही २० ते ३० वर्षापुर्वीची आहे. जुनी पाईप लाईन असल्याने ही लाईन कमकुवत आणि निकृष्ट झालेली आहे. त्यामुळे नागरीकांना पाण्याचा फार मोठा त्रास सहन करावा लागतो. ज्या भागात थोड्या फार प्रमाणात पाणी येते ते दुषीत येते, त्याकरीता ह्या वसाहतीसाठी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत खालील प्रमाणे रुपये ५०,००,०००/- (र.रु.पन्नास लक्ष) चा निधी उपलब्ध करुन मिळावा.

१) मनपा जलकुंभ ते गौतम बुध्द पुतळा, पुतळ्याच्या आसपास परिसरातील तीन गल्ल्या र.रु.२०,००,०००/-.
२) रिक्षा स्टँड ते साबळे दवाखाना ते राहूल पगारे यांचे घर ते जाधवची गिरणी ते रोहीदास गल्ली र.रु.२०,००,०००/-.
३) साबळे दवाखाना ते इब्राहिम शहा मस्जिद ते शनि मंदिर परिसर र.रु.१०,००,०००/-.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप **अनुमोदक:-** श्रीमती भारती महेंद्र सोनवणे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३६, ब्रिजवाडी येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत खालील प्रमाणे रुपये ५०,००,०००/- (र.रु.पन्नास लक्ष) चा निधी उपलब्ध होणेस मंजुरी देण्यात येते.

१) मनपा जलकुंभ ते गौतम बुध्द पुतळा, पुतळ्याच्या आसपास परिसरातील तीन गल्ल्या र.रु.२०,००,०००/-.
२) रिक्षा स्टँड ते साबळे दवाखाना ते राहूल पगारे यांचे घर ते जाधवची गिरणी ते रोहीदास गल्ली र.रु.२०,००,०००/-.
३) साबळे दवाखाना ते इब्राहिम शहा मस्जिद ते शनि मंदिर परिसर र.रु.१०,००,०००/-.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९०६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प सन २०१६-२०१७ मध्ये वॉर्ड क्र.७,मयुरपार्क अंतर्गत असलेल्या विकास कामाचे लेखाशिर्ष खालील प्रमाणे बदलणे आवश्यक आहे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्प सन २०१६-२०१७ मधील लेखाशिर्ष | नवीन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १ | गंगाधर चव्हाण (अरुणोदय) सो स.नं.१८८/१ अंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे, जलनि:सारण वाहिनी टाकणे.<br>LAYOUT NEW WORK P.NO.5 बुक:- १ रक्कम रुपये १० लक्ष | वॉर्ड क्र.७, मयुरपार्क अंतर्गत खुली जागा विकसित करणे-१० लक्ष रूपये. |

**सुचक:-** श्री.विजय साईनाथ औताडे **अनुमोदक:-** श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७, मयुरपार्क अंतर्गत असलेल्या विकास कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्प सन २०१६-२०१७ मधील लेखाशिर्ष | नवीन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १ | गंगाधर चव्हाण (अरुणोदय) सो स.नं.१८८/१ अंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे, जलनि:सारण वाहिनी टाकणे. LAYOUT NEW WORK P.NO.5 बुक:- १ रक्कम रुपये १० लक्ष | वॉर्ड क्र.७,मयुरपार्क मध्ये असलेल्या साहुजी संकुल बिल्डींगच्या बाजुला स.नं.१७९/५/ए येथील खुल्या जागेत सभागृह बांधणे, रक्कम रुपये १० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९०७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प सन २०१६-२०१७ मध्ये वॉर्ड क्र.७, मयुरपार्क अंतर्गत असलेल्या विकास कामांचे लेखाशिर्ष खालील प्रमाणे बदलणे आवश्यक आहे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्प सन २०१६-२०१७ मधील लेखाशिर्ष | नवीन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.०७ मध्ये पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी रोड साईड गटार तयार करणे. SCR Ward-B-P.NO.10 र.रु.५ लक्ष. | वॉर्ड क्र.७, मधील जळगाव रोड ते मारोतीनगर पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. परंतु मारोती मंदिर ते देवगिरी बँक पर्यतच्या रस्त्यावर ड्रेनेज व पाणीपुरवठा लाईन टाकण्याचे काम करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर रस्ता हा पूर्णपणे खोदण्यात आला होता. सदर रस्त्याचे मजबुतीकरण करून डांबरीकरण करणे आवश्यक आहे. या कामासाठी रु..५लाख इतका निधी कमी पडत आहे. र.रु. ०५ लक्ष |

**सुचक:-** श्री.विजय साईनाथ औताडे **अनुमोदक:-** श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७, मयुरपार्क अंतर्गत असलेल्या विकास कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्प सन २०१६-२०१७ मधील लेखाशिर्ष | नवीन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.०७ मध्ये पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी रोड साईड गटार तयार करणे. SCR Ward-B-P.NO.10 र.रु.५ लक्ष. | वॉर्ड क्र.७, मधील जळगाव रोड ते मारोतीनगर पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. परंतु मारोती मंदिर ते देवगिरी बँक पर्यतच्या रस्त्यावर ड्रेनेज व पाणीपुरवठा लाईन टाकण्याचे काम करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर रस्ता हा पूर्णपणे खोदण्यात आला होता. सदर रस्त्याचे मजबुतीकरण करून डांबरीकरण करणे आवश्यक आहे. या कामासाठी रु.५ लाख इतका निधी कमी पडत आहे. र.रु.०५ लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९०८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६६ अजबनगर, कैलासनगर मधील खालील दर्शविलेल्या कामांचे लेखाशिर्ष बदलण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | जुने कामाचे नाव | नवीन कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | “शहर सौंदर्यीकरण” नवीन कामे अशोक सम्राट चौक येथे नाव निर्देशीत कमान बसविणे बाबत. र.रु.२० लक्षची तरतुद करण्यात आली आहे. SCR WARD-D-P.N.३३. | १. वॉर्ड क्र.६६ अजबनगर, कैलासनगर येथील पटेल कॉलनी, रोकडा हनुमान कॉलनी व कैलासनगर येथे विविध ठिकाणी कॉंक्रीट करणे बाबत. र.रु.२० लक्षची तरतुद करण्यात आली आहे. |

**सुचक:-**श्रीमती आशा नरेश भालेराव **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

